www.lokrakshanay.com | epaper.lokrakshanay.com | dainiklokrakshanay@gmail.com | +91 97023 86118



■ भक्तांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू दत्तगुरू

पान २ वर....

# दैनिक लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ



■ शहापूर व मुरबाड तालुका टँकरमुक्त करण्यासाठी...

पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १९२ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, शनिवार, १४ डिसेंबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118


## थोडक्यात



### किल्ले दुर्गाडी खटल्यातील वकिलांचा सत्कार

**कल्याण :** कल्याणच्या ऐतिहासिक दुर्गाडी किल्ल्यासंदर्भातील दाव्याचा निकाल तब्बल ४८ वर्षांच्या प्रतिक्षेनंतर लागला. दुर्गाडी किल्ला ही वक्फ बोर्डाची जागा असल्याचा मजलीस संघटनेचा दावा न्यायालयाने फेटाळला. न्यायालयात हिंदुच्या बाजूने मांडणाऱ्या वकिलांचा ऋणनिर्देश करण्यासाठीच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपनेते विजय साळवी यांच्यावतीने जाहीर सत्कार करण्यात आला. कल्याण पश्चिमेतील रामबागेतील श्री दत्तमंदिर येथील श्री दत्तजन्मोत्सवात ॲड सुरेश पटवर्धन यांचा सत्कार शिवसेना उपनेते विजय साळवी यांनी केला.ॲड. भिकाजी साळवी यांचा सत्कार जेष्ठ पत्रकार तुषार राजे यांनी केला. तर ॲड जयेश साळवी यांचा सत्कार रवि कपोते यांनी केला.

### जुहूगावातील ज्येष्ठ विरंगुळा केंद्राच्या प्रतीक्षेत




**नवी मुंबई :** जुहूगाव येथे विरंगुळा केंद्र उपलब्ध करून द्यावे या मागणीसाठी ज्येष्ठ नागरिक आधार संस्थेतील ज्येष्ठ नागरिक सहा वर्षांपासून पालिकेकडे पाठपुरावा करीत आहेत. या विरंगुळा केंद्राला योग्य जागा सापडत नसल्याची सबब महापालिका समाज विकास खात्यामार्फत देण्यात आली आहे. त्यामुळे जुहगावातील ज्येष्ठ नागरिक या केंद्राच्या प्रतीक्षेत आहेत. ज्येष्ठ नागरिकांना सायंकाळी काही क्षण निवांत घालविण्याच्या उद्देशातून नवी मुंबई महानगर पालिकेने शहरात ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्राची संकल्पना राबवली आहे. नवी मुंबई महानगरपालिका जेष्ठांना त्यांच्या हक्काचे सुसज्ज असे विरंगुळा केंद्र बांधून देणारी देशातील पहिली महानगरपालिका ठरली होती. पण अजूनही अनेक प्रभागात जेष्ठ नागरिक विरंगुळा केंद्रापासून वंचित आहेत.

वर्ल्ड हिन्दू इकॉनॉमिक परिषदेचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

# महाराष्ट्राला ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

● मुंबई, विशाल कारंडे :



महाराष्ट्राला देशातील सर्वाधिक विकसित राज्य बनवण्यासाठी विविध विकासांच्या धोरणांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्याला देशातील ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवणार आहोत. गेल्या वर्षी राज्याने अर्ध्या ट्रिलियनचे उद्दिष्ट पार केलेले आहे. आता २०२८ ते २०३० पर्यंत ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट पूर्ण करु असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.




जिओ वर्ल्ड कन्वेंशन सेंटर, बिकेसी, वांद्रे येथे दि. १३ ते १५ डिसेंबर या कालावधीत वर्ल्ड हिन्दू इकॉनॉमिक परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे, या परिषदेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शुभारंभ झाला असून यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. यावेळी माजी मंत्री तथा आमदार मंगल प्रभात लोढा, वर्ल्ड हिन्दू इकॉनॉमिक फोरमचे संस्थापक स्वामी विद्यानंद, अध्यक्ष राजेश शर्मा, प्रमुख वक्ते पद्मश्री टी. व्ही. मोहनदास पै, सहसचिव शैलेश त्रिवेदी यासह जगातील विविध क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहेच मात्र भविष्यात मुंबई फिनटेकची राजधानी बनेल. वर्ल्ड हिंदू इकॉनॉमिक परिषदेने भारताच्या संस्कृतीवर आणि विविध क्षेत्रातील विकासाच्या तत्वावर आधारित वेगवेगळ्या संकल्पना मांडल्या आहेत. पाश्चिमात्य संस्कृती आणि आपल्या संस्कृतीमध्ये मूलभूत अंतर आहे. पाश्चिमात्य संस्कृती मध्ये जो कोणी सक्षम आहे तोच विकास करू शकतो मात्र आपल्या संस्कृतीमध्ये प्रत्येक जन्मलेला व्यक्तीला आपला विकास करण्याचा हक्क आणि अधिकार आहे . भारताच्या नेत्रदीपक प्रगतीने सर्व जगाला थक्क करून टाकले आहे. सर्वाधिक गतीने पुढे येणारा भारत जगात तिसरी महासत्ता म्हणून पुढे येत आहे. जगातील लोक म्हणत होते की एवढे मोठी लोकसंख्या असलेला देश कशाप्रकारे प्रगती करू शकतो ? परंतु देशातील कुशल मनुष्यबळ हेच विकासाचे महत्त्वाचे साधन असून प्रत्येकाला विकासामध्ये सोबत घेऊन जात आहोत असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले.

महाराष्ट्र आज मोठ्या गतीने पुढे जात आहे. महाराष्ट्राला देशातील सर्वाधिक विकसित राज्य बनवण्यासाठी सल्लागार कमिटीची स्थापना केली असून या समितीच्या माध्यमातून महाराष्ट्र कोणकोणत्या क्षेत्रात पुढे जाऊ शकतो याचा अभ्यास करुन यावर आधारित महाराष्ट्राच्या विकासाची धोरणे आखली जात आहेत. पान २ वर

परभणीतील संविधान विटंबनेनंतर उसळलेल्या दंगलीबाबत

## वस्तुनिष्ठ अहवाल सादर करा - उपाध्यक्ष ॲड धर्मपाल मेश्राम

● नागपूर, नितीन देवळेकर :



परभणी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळील संविधानाच्या प्रतिकृतीला बाधा पोहचविल्याच्या घटनेबाबत महाराष्ट्र अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी तीव्र भावना व्यक्त केल्या आहेत. घटनेची सखोल चौकशी करुन वस्तुनिष्ठ तपशीलवार अहवाल आयोगाकडे तत्काळ सादर करण्याचे निर्देश ॲड. मेश्राम यांनी पत्राव्दारे जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांना दिले आहेत. परभणी येथे १० डिसेंबर रोजी घडलेल्या घटनेबाबत वृत्तपत्रात जे वृत्तांकन आले व घटनेनंतरच्या उसळलेल्या दंगलीसंदर्भात तपशीलवार माहिती सादर करण्याचे लेखी पत्र निर्गमित करण्यात आले आहे. पान २ वर

## आगामी महापालिकेच्या निवडणुकीत महाविकास आघाडी फुटणार?

● मुंबई, यश सावंत :

काँग्रेस-शिवसेनेचा वाद चव्हाट्यावर !



राज्यात विधानसभा निवडणुकीत सपाटून मार खालल्यानंतर शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाने आगामी महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी एकला चालो रे चा नारा पुकारला आहे. याबाबतची अधिकृत भूमिका जाहीर झालेली नसली तरीही मुंबई पालिका काबिज करायची असेल तर एकट्याने निवडणूक लढवली पाहिजे, असा सूर या पक्षातील नेत्यांकडून आवळला जातोय. दरम्यान, संजय राऊतांनीही याबाबत आज भाष्य केलं. मुंबईसह १४ महापालिकांमध्ये निवडणूक जिंकण्याकरता शिवसेनेने तयारी सुरू केली असल्याचं आज ते म्हणाले. पान २ वर

## वाळू व्यावसायिकांच्या १८ लाखाच्या बोटी नष्ट

● भिवंडी, विवेक गुंजाळ :



भिवंडी तालुक्यातील अंजुरदिवे, कशेळी, आलिमघर खाडी भागात दिवसरात्र बेकायदा वाळू उपसा करणाऱ्या वाळू व्यावसायिकांच्या १८ लाखाच्या बोटी, सक्शन पंप असे साहित्य शुक्रवारी सकाळी भिवंडी महसूल विभागाच्या पथकाने नष्ट केले. अचानक करण्यात आलेल्या या कारवाईने वाळू व्यावसायिका, मजुरांची पळापळ झाली.

भिवंडी जवळील कशेळी, अंजुरदिवे खाडी भागात दिवस-रात्र वाळू उपसा सुरू असल्याच्या तक्रारी भिवंडीचे तहसीलदार अभिजित खोले यांच्याकडे आल्या होत्या. या बेकायदा वाळू उपशाची खात्री केल्यानंतर उपविभागीय अधिकारी अमित सानप यांच्या आदेशावरून तहसीलदार अभिजित खोले, खारबाव, कोन, अंजुर, काल्हेर येथील मंडळाधिकारी, ग्राम महसूल अधिकारी यांनी शुक्रवारी सकाळी अचानक कशेळी, अंजुरदिवे खाडी भागात धाड टाकली. महसूल अधिकाऱ्यांची पथके आपल्या दिशेने येत आहेत याची चाहूल लागताच वाळू उपशांच्या बोटींवरील मजूर, त्यांचे प्रमुख बोटी, सक्शन पंप टाकून पळून गेले.

या कारवाईच्यावेळी पथकाने आलिमघर येथे खाडी पात्रात उभे असलेले एक बार्ज, दोन सक्शन पंप कौशल्याने खाडी किनारी आणून तोडकाम पथकाच्या साहाय्याने नष्ट केले. काल्हेर येथे बंदर किनाऱ्याजवळ दोन सक्शन पंप नष्ट करण्यात आले. एका बार्जला कटरने छिद्र पाडून तो खाडीत बुडविण्यात आला. अशाप्रकारे वाळू व्यावसायिकांचे बार्ज, स्कशन पंप अशी एकूण १८ लाखाची मालमत्ता कारवाई पथकाने नष्ट केली. पथकाने या भागात वाळू व्यावसायिक, मजुरांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला पण ते पळून गेले होते. भिवंडी येथे कारवाई सुरू झाल्याची माहिती मिळताच डोंबिवली मोठागाव, कोपर भागातील वाळू व्यावसायिक बोटी घेऊन खाडीतून पळून गेले. पान २ वर

## बीडमध्ये २७ डिसेंबरपर्यंत 'मनाई आदेश लागू

● बीड, (सचिन कदम) :



- बीड जिल्ह्यात मराठा, ओबीसी, धनगर आरक्षणाविषयी आंदोनलातच्या पार्श्वभूमीवर मनाई आदेश लागू करण्यात आलं आहे. १६ तारखेपासून अधिवेशन सुरू असून, या दरम्यान कोणतेही अनुचित प्रकार घडू नये, या पार्श्वभूमीवर हा मनाई आदेश लागू करण्यात आला आहे. १२ डिसेंबरपासून मनाई लागू करण्यात आला असून, २७ डिसेंबरपर्यंत हा मनाई आदेश लागू असणार आहे.बीड जिल्ह्यात गुन्ह्यांच्या प्रकरणांमध्ये वाढ झालीय. अशातच बीड जिल्ह्यात १२ ते २७ डिसेंबरपर्यंत मनाई आदेश लागू करण्यात आलाय. दरम्यान, जिल्ह्यात मनाई आदेशाच्या पार्श्वभूमीवर, पाच पेक्षा अधिक जणांना परवानगीशिवाय एकत्र जमण्यास बंदी असणार आहे. त्याशिवाय मार्चा, आंदोनले, सभा, उपोषणे परवानगीशिवाय घेणयासही बंदी असणार आहे.

दरम्यान, बीडच्या संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ, सकल मराठा बांधवांच्यावतीनं बीड जिल्हा बंदचे हाक देण्यात आलीय. बीड जिल्ह्यातील अकराही तालुक्यात हा बंद पुकारण्यात आलाय. या बंदला जिल्ह्यात समिश्र प्रतिसाद मिळत आहे. पान २ वर

## दिल्लीत अदानींच्या घरी भाजपचा केंद्रीय नेता आणि शरद पवार गटाच्या नेत्याची गुप्त भेट



● मुंबई, विशाल पाटील :

राज्यातील विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर आता शरद पवार यांच्या नेतृत्त्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष भाजपसोबत हातमिळवणी करणार का, अशी शंका निर्माण झाली आहे. गुरुवारी शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त अजित पवार यांनी सहकुटुंब दिल्लीतील निवासस्थानी त्यांची भेट घेतली होती. त्यानंतर काल दुपारी उद्योगपती गौतम अदानी यांच्या दिल्लीतील घरी शरद पवार गटातील एक बडा नेता आणि भाजपच्या एका केंद्रीय नेत्याची बैठक पार पडल्याची माहिती समोर आली आहे. या भेटीमुळे महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा राजकीय भूकंप होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर शरद पवार गटातील आमदार आणि खासदारांमध्ये चलबिचल सुरु झाल्याची माहिती आहे. दिल्लीत ४ डिसेंबरला शरद पवार गटाच्या खासदारांची महत्त्वाची बैठक झाली होती. या बैठकीत आपण सत्तेत गेले पाहिजे, असा मतप्रवाह दिसून आला होता. मात्र, शरद पवार गटात यावरुन दोन गट पडल्याची माहिती आहे. शरद पवार गटाने आपले स्वतंत्र अस्तित्व ठेऊन भाजपसोबत सत्तेत सामील व्हावे, असे एका गटाचे म्हणणे आहे. पान २ वर

## आमदार स्नेहा दुबेंकडून पालिका अधिकाऱ्यांना कडक निर्देश

"बजेट वाढवा पण शाळा सुरू करा"

● वसई, सुचिता सोनावणे:



वसईच्या आमदार स्नेहा दुबे पंडित यांनी पहिल्याच आढावा बैठकीत पालिका अधिकाऱ्यांची चांगलीच झाडाझडती घेतली. शाळा सुरू करण्याबाबत पालिकेच्या उदासिनतेबबाबत त्या चांगल्याच संतप्त झाल्या. पालिकेचे बजेट वाढवा, मॅरेथॉन सारखे उत्सव बंद करा पण शाळा सुरू करा असे कडक निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. स्नेहा दुबे पंडित या वसई विधानसभेवर निवडून आल्या आहेत. आमदार झाल्यावर त्यांनी कामांना सुरुवात केली आहे. पालिकेने कुठली कामे केली केली, कुठली कामे प्रलंबित आहेत त्या कामांचा आढावा घेण्यासाठी स्नेहा दुबे यांनी पालिका अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली.

या बैठकीत समाधानकारक काम न आढळल्याने त्यांनी पालिका अधिकाऱ्यांची चांगलीच झाडाझडती घेतली. वसई विरार महापालिकेच्या स्थापनेला १४ वर्षे झाली आहेत. मात्र महापालिकेची एकही शाळा नाही. याबाबत त्यांनी पालिका अधिकाऱ्यांना जाब विचारला. जिल्हा परिषदेच्या मालकीच्या ११७ शाळा हस्तांतरित करण्याबाबत विचार असल्याचे पालिका अधिकाऱ्यांनी सांगितले.

परंतु या शाळा ताब्यात घेतल्या तर पालिकेवर १०० कोटींचा 'बोजा पडेल असे उत्तर पालिका अधिकाऱ्यांनी दिले. ते ऐकतात स्नेहा दुबे चांगल्याच भडकल्या. शिक्षण देणे हे महापालिकेचे मूलभूत कर्तव्य आहे. त्याला बोजा कसा म्हणू शकता असा सवाल त्यांनी केला. पालिकेच्या अर्थसंकल्पात १०० कोटींची वाढ करा. वेळ पडली तर मॅरेथॉन आणि पैशांची उधळपट्टी करणारे उत्सव बंद करा, पण शाळा सुरू करा आणि त्यांनी सांगितले. ११७ शाळा स्वतंत्र सुरू करण्यापेक्षा दहा दहा शाळा एकत्रित करून एकेक शाळा विकसित करा, अशी सूचना त्यांनी केली. पान २ वर

## संपादकीय

# मोकळा श्वास !

सीरियातील हुकूमशाही अखेर संपुष्टात आली. आता सत्ताबदलाची तयारी सुरू आहे. मात्र नव्या सरकारबाबत स्पष्टता नाही. सीरियन लष्कराच्या माघारी नंतरही जगाच्या नजरा सीरियाकडे लागल्या आहेत. सीरियात अध्यक्ष बशर अल असाद यांच्या कुटुंबाची सलग ५४ वर्षे जुनी राजवट संपुष्टात आली आहे. बशरला शेवटी देश सोडून पळून जावे लागले. त्याने रशियात आश्रय घेतला अशी शक्यता आहे. 'हयात तहरीर अल- शाम' (एचटीएस) च्या नेतृत्वाखालील बंडखोर गटांनी हमा आणि अलेप्पोसारख्या राजधानी दमास्कससह देशातील अनेक प्रमुख शहरे ताब्यात घेतली आहेत आणि सरकारच्या पतनाला हुकूमशाहीचा अंत असे म्हटले आहे. लष्करानेही बशर राजवट संपल्याचे जाहीर केले आहे. बशर आणि त्याचे वडील हाफेज अल- असद यांनी सीरियावर ५४ वर्षे राज्य केले. १९७१ मध्ये हाफिजने लष्करी बंड करून सत्ता काबीज केली. १९४६ मध्ये देशाच्या स्वातंत्र्यानंतर सीरियामध्ये सत्तापालटाचे अनेक अयशस्वी प्रयत्न झाले आणि या राजकीय अस्थिरतेमध्ये हाफिजचा उदय झाला. हाफिज अलावाइट नामी अल्पसंख्याक समुदायाचा होता. त्याने स्वतःला सत्तेवर स्थापित करण्यासाठी देशातील जातीय विभाजनाचा फायदा घेतला. 'फूट पाडा आणि राज्य करा' ही रणनीती त्याने स्वीकारली आणि त्याच्या सरकारमधील महत्त्वाच्या लष्करी आणि सरकारी पदांवर फक्त अलावी समुदायातील नियुक्ती केली. यामुळे कुटुंबाच्या अनेक दशकांच्या राजवटीचा पाया घातला गेला. हाफिजने १९८२ मध्ये हमामध्ये मुस्लीम ब्रदरहूडचा निर्घृणपणे खात्मा केला होता. यामध्ये हजारो लोक मारले गेले आणि ही घटना हाफिज असादच्या हुकूमशाहीचा सर्वात मोठा पुरावा ठरला. त्याच्या राजवटीत, मतभेद किंवा विरोधाचा एकच परिणाम होता, तो म्हणजे मृत्यू. २००० मध्ये जेव्हा हाफिज अल असाद मरण पावला, तेव्हा डॉ. बशर अल असादमध्ये लोकांना आशेचा किरण दिसला. पाश्चात्य देशात शिकलेला बशर अल-असाद सुधारणा घडवून आणील, असे लोकांना वाटले. परदेशात वैद्यकीय शिक्षण घेऊन परतलेला बशर राजकारणापासून दूर होता. मात्र १९९४ मध्ये मोठा भाऊ बसेलचा रस्ते अपघातात मृत्यू झाला. यानंतर सत्ता बशरकडे आली. सुरुवातीला बशर हा आधुनिकीकरणाचा समर्थक होता. तथापि, बशरला वडिलांकडून हुकूमशाहीचा वारसा मिळाला. हाफिजने कठोर राजकीय व्यवस्था आणि लष्करी आणि गुप्तचर सेवांमध्ये निष्ठावंतांचे शक्तिशाली नेटवर्क उभारले होते. बशरचा भाऊ माहेर आणि चुलत भाऊ रामी मखलूफ हे सत्तेचे प्रमुख चेहरे बनले आणि इतरांसोबत देशाची लूट सुरू केली. देश भ्रष्टाचाराचा अड्डा झाला. २०११ मध्ये अरब स्प्रिंग नामी जन उद्रेक सीरियात पोहोचला, तोपर्यंत सीरिया आधीच बशरच्या राजवटीत आर्थिक मंदी, गरिबी आणि दुष्काळाशी झुंजत होता. ५ लाखांहून अधिक लोकांना आपला जीव गमवावा लागला. सीरियन लोकांनी २०११ मध्ये बशरच्या राजवटीच्या विरोधात शांततापूर्ण निदर्शने सुरू केली. ती गृहयुद्धात बदलली. या कालावधीत ५ लाखांहून अधिक लोकांचा मृत्यू झाल्याचा अंदाज आहे. असादने नियंत्रण राखण्यासाठी आपली सर्व शक्ती वापरली. उघडपणे लोकांवर हवाई हल्ले केले. रासायनिक शस्त्रंदेखील दोनदा वापरली गेली. त्याचा जगभरातून निषेध झाला; परंतु त्याला त्याची पर्वा नव्हती. असादच्या सैन्याने सर्वात मोठे शहर अलेप्पोच्या काही भागांवर नियंत्रण गमावले. त्या वेळी त्याला रशिया आणि इराणने वाचवले होते. २०१६ मध्ये 'एचटीएस'चा म्होरक्या अबू मोहम्मद अल-गोलानी याने 'अल-कायदा'शी संबंध तोडल्यानंतर आणि धार्मिक सहिष्णुता स्वीकारण्याची शपथ घेतल्यानंतर गटाची प्रतिमा पुन्हा तयार करण्याचा प्रयत्न केला. या गटाचे उत्तर-पश्चिम सीरियावर नियंत्रण आहे आणि २०१७ मध्ये या प्रदेशात 'मुक्त सरकार' देखील तयार केले आहे. 'इसिस' सारख्या अतिरेकी गटांचा उदय तसेच अमेरिका, रशिया आणि तुर्कस्तानसारख्या शक्तींच्या परकीय हस्तक्षेपामुळे युद्ध गुंतागुंतीचे झाले होते. अलीकडे हयात तहरीर अल-शाम (एचटीएस) ने इराण आणि हिजबुल्लाहचे लक्ष इस्रायल विरोधातील संघर्षात लागले आहे तर युक्रेन युद्धात रशिया गुंतल्याचे हेरून बशर विरोधात उठाव केला गेला आणि त्याला सत्तेवरून हटवले. १३ वर्षांच्या भीषण युद्धानंतर अनेक निष्पाप लोकांचे प्राण गमावल्यानंतर आणि प्रचंड मालमत्तेचा नाश झाल्यानंतर सीरियातील बंडखोर गटांनी राजधानी दमास्कसवर कब्जा केला आहे. यासोबतच त्यांनी संपूर्ण देशाला मुक्त घोषित केले आहे. बशरच्या सत्तापतनानंतर राजधानीत उत्सवाचे वातावरण आहे.

दमास्कसची काही काळापूर्वी बॉम्बस्फोट आणि गोळ्यांचे आवाज अशी ओळख बनली होती, आता लोक तेथे आनंदोत्सव साजरा करत आहेत. रस्त्यावर गर्दी होत आहे, झेंडे फडकवले जात आहेत आणि लोक स्वातंत्र्याच्या घोषणा देत आनंद व्यक्त करत आहेत. अशीच दृश्यं देशाच्या इतर भागात विशेषतः लेबनॉन सीमेजवळ दिसली. या उत्सवाने लाखो सीरियन लोकांसाठी आशेचा किरण आणला आहे. ते अनेक वर्षांपासून विस्थापन आणि अस्थिरतेचा सामना करत होते. अनेक विस्थापित नागरिक आता आपल्या घरी परतण्याचा विचार करत आहेत. २०११ मध्ये सीरियात बंडखोरी सुरू झाली, तेव्हा असद सरकारने लोकशाही समर्थक निदर्शने क्रूरपणे चिरडली. हा संघर्ष हळूहळू गृहयुद्धात बदलला. त्यात असद सरकारच्या विरोधात अनेक बंडखोर गट उठले. सरतेशेवटी, या १३ वर्षांच्या संघर्षाने असद राजवट खाली आणली. दमास्कस काबीज करून, बंडखोर गटांनी असद सरकारची केवळ हकालपट्टीच केली नाही, तर सीरियन लोकांना नवप्रारंभ करण्याची संधी दिली आहे. हा तोच सीरिया आहे, जेथं 'इसिस' या दहशतवादी संघटनेने आपली पाळेमुळे रोवली होती. आता पुन्हा एकदा तोच धोका नाव बदलून निर्माण होऊ नये म्हणजे झालं. हाफिजचा पुतळा पाडून बंडखोर विजयाचा आनंदोत्सोव साजरा करत आहेत; मात्र त्यांच्यासाठी हा धक्का नसल्याचे सीरियन लष्कर सांगत आहे. त्यानुसार त्यांनी काळजीपूर्वक विचार करून एक पाऊल मागे घेतले आहे. सीरियन सैन्य शहराबाहेर पुन्हा तैनात आहे. शहरी युद्ध टाळणे हा त्याचा उद्देश आहे जेणेकरून निष्पाप लोकांचे रक्त सांडू नये. गेल्या १३ वर्षांत बंडखोर एवढ्या वेगाने असादच्या विरोधात पुढे जाण्याची ही पहिलीच वेळ आहे. सीरियात युद्ध सुरू असताना दोन्ही बाजूंनी दहशतवादी संघटना होत्या. एका बाजूला कायदा' सोबत राहिलेली 'हयात तहरीर अल-शाम' आणि दुसर्या बाजूला 'हिजबुल्लाह' आहे. त्यामुळे आगामी काळात सीरियात पुन्हा एकदा तोच विध्वंस बघायला मिळाला तर आश्चर्य वाटू नये. या गृह असंतोषाला भूमी राजकीय, वांशिक, धार्मिक अन् पंथभेदाची विशेष करून शिया विरुद्ध सुन्नी असे विविध कांगोरे आहेत.

# भक्तांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू दत्तगुरू

दत्तगुरू हे अनेकांचे श्रद्धास्थान. त्यामुळेच दत्त जयंती नेहमीच मोठ्या उत्साहात साजरी केली जात असते. गेली कित्येक वर्षे परंपरेने दत्त जयंती साजरी करणे सुरूच आहे. आजही (रविवार, ३ डिसेंबर) ती साजरी होत आहे. म्हणूनच दत्तगुरूबाबत ही थोडक्यात माहिती...

सर्वसामान्य माणसाच्या भक्तीचा केंद्रबिंदू म्हणजे दत्त. स्वधर्म, संस्कृती आणि जगण्यातील संघर्ष, व्यथा, वेदना आर्दींमुळे व्यक्ती जेव्हा हैराण होतात तेव्हा दत्तगुरू मदतिला येतात अशी अनेकांची भावना आहे. अत्रि ऋषी आणि त्यांची पत्नी अनसूया यांच्या पोटी जन्माला आलेले रत्न म्हणजे दत्त ही देवता, असा उल्लेख पुराणांमध्ये आढळतो. संपूर्ण एकच असलेल्या मानवी शरीराला तिन तोंडे अशी दत्तमूर्तीची रचना असते. त्या त्रिमूर्तीत एक दत्ताची तर, दुसऱ्या दोन्हीपैकी एक दुर्वास व दुसरा सोम अशा दोन्ही भावांचाही समावेश असल्याचा उल्लेख



पुराणात आहे. दत्ताचा उल्लेख त्याचे साधक, परंपरेने गुरुदेव असा करतात. दत्तमुर्तीच्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेबद्धल अनेकदा कुतूहल व्यक्त होते. मात्र, हिंदू पौराणिक साहित्याचा आधार घ्यायचा तर, दत्त, सोम आणि दुर्वास अशा तिघांची एकत्र मूर्ती म्हणजे हा विष्णू, ब्रह्मा व शिव यांचा अवतार असल्याचा उल्लेख सापडतो. पूर्व काळात विष्णू म्हणून प्रचलित असलेले दत्त उत्तर काळात उत्तर काळात ब्रह्मा, विष्णु आणि महेश अशा तिन्ही देवांचे अंशरूप आहे.

त्रीमुखी असलेली दत्त देवता ही प्रामुख्याने औदुंबराच्या वृक्षाखाली यज्ञकुंडासमोर अथवा अग्नीसमोर बसलेली दिसते. गळ्यात रुद्राक्षमाळा, अंगावर भस्माचे पट्टे, समोर चार कुत्री, मागे गाय असा परिसर हमखास दिसतोच. दत्तमुर्तीसोतब असणारी चार कुत्र्यांचाही विशेष अर्थ असतो. ही चार कुत्री हे वेद आणि शंकराचे भैरव मानले जातात. तर, स्वत: दत्त वाढेलेल्या दाढीत दिगंबर आवस्थेतही दिसतात. रुद्राक्ष, अंगावर भस्म यांवरून तो स्मशानात राहणाऱ्या शिवाचे ध्यान करत असल्याचे पटकण लक्षात येते.

संत एकनाथ, संत तुकाराम आदी संतांच्या गवळण आणि अभंगातूनही दत्त महात्त्म्याचा उल्लेख आढळतो.

# विधानसभा निवडणुकीत काम केलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांचा गुणगौरव संपन्न

## कर्मचाऱ्यांच्या अपार मेहनत, कार्यक्षमतेमुळे निवडणुकीचे कामकाज पारदर्शकपणे पार पडले - जिल्हाधिकारी अशोक शिनगारे

**ठाणे (विशाल कारंडे) -** विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत ठाणे जिल्ह्यातील निवडणुकीच्या कामातील सर्वच अधिकारी, कर्मचाऱ्यांनी अतिशय उत्कृष्टपणे कामे केली. त्यांच्या अपार मेहनत, कार्यक्षमतेमुळेच ही निवडणूक पारदर्शकपणे पार पडली असल्याचे गौरवोद्गार जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी आज येथे काढले. विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये काम केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गुणगौरव सोहळा आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे पार पडला. त्यावेळी श्री. शिनगारे यांच्या हस्ते निवडणुकीत विविध पथकांमध्ये नियुक्त केलेल्या अधिकारी, कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी मनीषा जायभाये, उपजिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली



माने, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) हरिश्चंद्र पाटील, उपजिल्हाधिकारी रोहयो मल्लिकार्जून माने, जिल्हा पुरवठा अधिकारी विकास गजरे, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) सर्जेराव म्हस्के पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी, जिल्हा सूचना अधिकारी नरेंद्र भांबरे आदी यावेळी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. शिनगारे म्हणाले की, सार्वत्रिक निवडणुकीत प्रत्येकानेच अतिशय सजगपणे कामे केली. प्रत्येक अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या सहभागानेच ही निवडणूक प्रक्रिया पार पडली. आचारसंहितेसंदर्भात आलेल्या तक्रारींचे निवारण अतिशय जलदगतीने झाले. ठाणे जिल्ह्यातील काही मतदारसंघात गेल्या निवडणुकीच्या वेळी अतिशय कमी मतदान झाले होते. यंदा मतदानाची टक्केवारी वाढविण्याचे उद्दिष्ट होते. स्विप पथकाने केलेल्या जनजागृतीमुळे मागील निवडणुकीपेक्षा यंदा जिल्ह्यात ९ टक्के जास्त मतदान झाले आहे. त्याच बरोबर इतर सर्व पथकांनी सर्व अडचणी, प्रश्न, टिका यांना सामोरे जात क्षमतेने कामे केली आहेत. या सर्वांच्या सहकाऱ्यांमुळेच ठाणे जिल्ह्यातील निवडणुकीच्या कामाचे मुख्य निवडणूक अधिकारी तसेच माजी ज्येष्ठ सनदी अधिकारी यांनी कौतुक केले. अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीमती जायभाये यांनी देशाच्या पहिल्या निवडणुकीपासून ते आतापर्यंतच्या निवडणुकीचा मागोवा घेऊन सांगितले की, पहिल्या निवडणुकीत देशातील सर्वच पात्र नागरिकांना मतदानाचा पवित्र हक्क मिळावा, यासाठी पाऊले उचलण्यात आली होती. ती परंपरा आजही सुरू असून कोणताही नागरिक मतदानापासून वंचित राहू नये, यासाठी निवडणूक यंत्रणा काम करत आहे. निवडणूक प्रक्रिया ही अविरत चालणारी प्रक्रिया असून ठाणे जिल्ह्यातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी ही प्रक्रिया पारदर्शकपणे व योग्यरित्या पार पाडल्याचे त्यांनी सांगितले. निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. माने यांनी निवडणुकीच्या मनुष्यबळ व्यवस्थापनात आलेले अनुभव कथन केले. तसेच निवडणूक काळात काम केलेल्या सर्वांचा गौरव केल्याबद्दल जिल्हाधिकारी यांचे आभार मानले. प्रास्ताविकात उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्रीमती माने यांनी जिल्ह्यातील निवडणूक कामातील सर्वच घटकांचे आभार मानले. विधानसभा सार्वत्रिक निवडणूक काळात सर्वच यंत्रणांनी अहोरात्र कामे करून त्यांना सोपविलेली जबाबदारी पार पाडली. नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांनी कामे अतिशय चांगल्या प्रकारे केली असून अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मनापासून काम केले असल्याचे सांगितले.

## पान १ वरून...

## महाराष्ट्राला ट्रिलियन डॉलर...

जागतिक पातळीवरती महाराष्ट्र विकासाला पूरक एक साखळी बनवत आहे. यामध्ये लॉजिस्टिक धोरण, सर्वाधिक गतिमान रस्त्यांचे जाळे बनवण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे. नागपूर - मुंबई समृद्धी महामार्ग ७०० किलोमीटर असून जो १६ जिल्ह्यांना जोडला असून हा महामार्ग थेट जेएनपीटी या बंदराला जोडला आहे, यातून अत्यंत चांगल्या पुरवठा दारांची साखळी निर्माण होत आहे. रस्ते, विमान वाहतूक, बंदर विकास या पायाभूत सुविधा सक्षम करण्यावरती राज्य शासन भर देत आहे. देशासोबतच महाराष्ट्राला मेरीटाईमची ताकद बनवण्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा ध्यास आहे. सन २०१४ पासून प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणाला गती दिली आहे असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगीतले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशाच्या विकासाला गती देणारे नवीन धोरण बनवलेले आहेत. भारताने गेल्या दहा वर्षात २५ कोटी लोकांना दारिद्र्यरेषेच्या वरती आणलेले आहे. सन २०३० पर्यंत भारताला पाच ट्रिलियन अर्थव्यवस्था बनवणार आहोत. हे उद्दिष्ट आम्ही २०२८ पर्यंतच पूर्ण करू. जागतिक पातळीवरील आर्थिक संस्थांच्या माध्यमातून भारत देश सात ट्रिलियन इकॉनॉमिचे किंवा नऊ ट्रिलियनचेही उद्दिष्ट गाठू शकतो असे सर्वेक्षण समोर येत आहे. यासाठी आधुनिक तंत्रज्ञानावरती आधारित विकासावर अधिक भर देण्यात येत आहे. सन २०२० च्या देशपातळीवरील विकास सर्वेक्षणानुसार महाराष्ट्र देशात भूजल पातळी मध्ये देखील प्रथम होते. राज्यातील वनांचे आच्छादन देखील जास्त आहे. ग्रीन ऊर्जा, नदीजोड प्रकल्प यातून शाश्वत विकासावरती राज्य शासन भर देत आहे असेही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी सांगितले.

प्रमुख वक्ते पद्मश्री टी. व्ही. मोहनदास पै म्हणाले की, देशामध्ये उपलब्ध मनुष्यबळ हे आपल्या विकासाचे बलस्थान आहे. विकसित भारत हेच भारताचे भवितव्य आहे. भारतीय संस्कृती हा विचार आहे तो जगात पुढे नेणे गरजेचे आहे. युवांना उत्कृष्ट दर्जाचे शिक्षण देणे, आरोग्य, शिक्षण, डिजिटल तंत्रज्ञान, महिला सबलीकरण यावरती काम होणे गरजेचे आहे.

## आगामी महापालिकेच्या...

त्यामुळे महाविकास आघाडीतून फुटून शिवसेना स्वतंत्र निवडणूक लढवणार असल्याचं अधोरेखित झालं आहे. यावरून काँग्रेसचे नेते आणि विधानसभेचे माजी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी संजय राऊतांवर टीका केली आहे.

"महापालिकेच्या निवडणुका केव्हाही लागू द्या. शिवसेनेने मुंबईसह १४ महापालिका निवडणुकांच्या तयारीला सुरुवात केली आहे. आम्ही अत्यंत ताकदीने निवडणुका लढवू. तीन-साडेतीन वर्षे निवडणुका अडवून ठेवल्या. महापौर दिले नाहीत, कारण त्यांना हरण्याची भीती होती. विधानसभा निवडणुकीत आम्ही वाममार्गाने विजय मिळवू शकतो याची खात्री पटल्यानंतर त्यांनी आता महापालिकेच्या निवडणुकांची तयारी केली आहे. पण मुंबईत मराठी माणूस टिकावा, मराठी माणूस राहावा, मुंबई ही मराठी माणसाची राजधानी आहे, यासाठी आम्ही प्राणांची बाजी लावून ही निवडणूक लढवू", असं संजय राऊत म्हणाले.

विजय वडेट्टीवार काय म्हणाले?

"संजय राऊतांच्या देहबोलीतून असं जाणवतंय की त्यांना नैराश्य आलंय. कदाचित या नैराश्येपोटी त्यांनी एकला चालो रे चा नारा दिला असेल. त्यांनी स्वतंत्र लढण्याचा निर्णय घेतला असेल तर तो त्यांचा अधिकार आहे. आघाडी म्हणून आम्ही एकत्र लढण्यास तयार आहोत. परंतु, संजय राऊतांच्या भूमिकेसंदर्भात एकदा स्पष्टता आली की आम्ही आमचा निर्णय घेऊ", असं विजय वडेट्टीवार म्हणाले.

...तर आम्ही स्वबळावर लढू

"तीन वर्षांपूर्वी महानगरपालिका बरखास्त झाली. तीन वर्षांपासून काँग्रेसचे कार्यकर्ते कामाला लागले आहेत. मतदारसुद्धा आतुर आहेत. कारण सामान्य नागरिकांचे प्रश्न महानगरपालिकेतून सुटतात. कोणाचीही इच्छा नसेल तर आम्ही नागपुरात स्वबळावर निवडणूक लढवणार", अशी प्रतिक्रिया काँग्रेसचे नेते विकास ठाकरे यांनी दिली. राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातून मिळालेल्या माहितीनुसार, सर्वोच्च न्यायालयात २२ जानेवारी रोजी राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत सुनावणी होणार आहे. प्रामुख्याने महापालिकांसह अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांची सदस्य संख्या किती असावी, प्रभाग रचना कशी असावी आणि प्रभाग रचना, सदस्यांची संख्या राज्य निवडणूक आयोगाने ठरवावी की राज्य सरकारने, याबाबतचा निर्णय सर्वोच्च न्यायालयात झाल्यानंतर निवडणुकीची तयारी करण्यासाठी किमान तीन महिन्यांचा वेळ लागेल. त्यामुळे तूर्तास महानगरपालिकांसह नगरपालिका, नगर पंचायती, जिल्हा परिषदा आणि पंचायत समितींच्या निवडणुका होण्याची शक्यता नाही.

## वाळू व्यावसायिकांच्या १८...

भिवंडी जवळील खाडी भागात बेकायदा वाळू उपसा करणाऱ्या वाळू व्यावसायिकांवर नियमित कारवाई केली जाते. कशेळी, अंजुरदिवे भागात वाळू उपशाच्या तक्रारी आल्याने या भागात कारवाई करून वाळू व्यावसायिकांची १८ लाखाची मालमत्ता नष्ट केली. ही कारवाई यापुढेही नियमित सुरू राहणार आहे.- अभिजित खोले, तहसिलदार, भिवंडी.

## बीडमध्ये २७ डिसेंबरपर्यंत...

तसेत बीड जिल्ह्यातील जनतेकडूनही या आदेशाचं पालन करण्यात येत आहे.

'संतोष देशमुख हत्या प्रकरण हे जिल्ह्याला काळिमा फासणारी घटना आहे. या प्रकरणात मुख्य आरोपी अजूनही मोकाट आहे. माझा पोलिसांवर भरोसा नाही. मोबाईल सापडले, परंतु ते जाहीर करत नाहीत. हे प्रकरण फास्टट्रॅकवर चालवावे. आरोपीला लवकरात लवकर अटक करणे गरजेचं आहे.' असं खासदार बजरंग सोनवणे यांनी सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात म्हटलं आहे.

## दिल्लीत अदानींच्या घरी...

तर दुसरा गट हा अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सामील होण्याच्या मताचा आहे. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसचे बहुतांश आमदार आणि खासदार हे आता सत्तेत सामील होण्याच्या बाजूने दिसत आहेत. तसे झाल्यास राज्यातील महाविकास आघाडीचे अस्तित्व संपुष्टात येईल. त्यामुळे आता पुढील काही तासांमध्ये काय घडणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. शरद पवार गट आणि भाजपमधील ही सगळी बोलणी दिल्लीत सुरु आहेत.

सूत्रांच्या माहितीनुसार, काल अदानी यांच्या घरी झालेल्या बैठकीत भाजपच्या केंद्रीय नेत्याने शरद पवार यांच्या गटातील नेत्याकडून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि आगामी काळातील शरद पवार गटाची भूमिका याबाबत माहिती घेतल्याचे समजते. उभय नेत्यांमध्ये बराच काळ चर्चा झाली. गेल्या काही दिवसांपासून शरद पवार गटाच खासदार अजितदादा गटात सामील होतील, अशी चर्चा सुरु होती. या चर्चेचे मूळ आणि पडद्यामागील घडामोडी आता एक-एक करुन समोर येताना दिसत आहेत. मात्र, शरद पवार यांनी भाजपसोबत जाण्याचा निर्णय घेतल्यास काँग्रेस आणि उद्धव ठाकरे गट काय प्रतिक्रिया देणार, हे पाहावे लागेल. शरद पवार हे भाजपसोबत सत्तेत सामील झाल्यास महाराष्ट्रातील राजकारणाची रचना पुन्हा एकदा बदलेल.

## आमदार स्नेहा दुबेंकडून पालिका...

जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षकांचे वेतन शासनाकडून दिले जाते. यासाठी शासनाकडे पाठपुरावा करून शिक्षकांच्या वेतनाचा प्रश्न सोडवावा, असेही त्या म्हणाल्या पर्यटन आणि तिर्थस्थळाच्या विकासासाठी काय योजना आहेत त्याबाबत दोन आठवड्यात अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. आरोग्य सुधारणा कशी करणार? राखीव भुखंडांवरील अतिक्रमण, पाणी योजनेतील अनियमितताट आदींबाबत त्यांनी अधिकाऱ्यांना जाब विचारला. मात्र त्याच्यावर अधिकाऱ्यांना समाधानकारक उत्तरं देता आली नाहीत. विकास कामे सुरू असताना त्याची माहिती नागरिकांना व्हावी यासाठी फलक लावण्याचे आदेश त्यांनी दिले. अधिकाऱ्यांना समाधानकारक उत्तरं देता आली नाहीत. फक्त कागदी घोडे नाचवत असल्याचे दिसले. शाळा सुरू करण्याबाबत पालिकेचे असलेली उदासीनता संतापजनक होती. यापुढे दर महिन्याला बैठक घेणार असून दिलेल्या सूचना आणि कामे झाली की नाही त्याचा आढावा घेणार असल्याचे स्नेहा दुबे पंडित यांनी सांगितले.

## परभणीतील संविधान...

ॲड. मेश्राम हे परभणी जिल्हा दौरा लवकरच करणार आहेत. परभणीच्या सामाजिक न्याय विभागाच्या सहाय्यक आयुक्तांनी या घटनेबाबत स्वतंत्र अहवाल तत्काळ सादर करावा असे देखील निर्देश आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांनी दिले.परभणी येथे १० डिसेंबर रोजी घडलेल्या घटनेबाबत वृत्तपत्रात जे वृत्तांकन आले व घटनेनंतरच्या उसळलेल्या दंगलीसंदर्भात तपशीलवार माहिती सादर करण्याचे लेखी पत्र निर्गमित करण्यात आले आहे. ॲड. मेश्राम हे परभणी जिल्हा दौरा लवकरच करणार आहेत.परभणीच्या सामाजिक न्याय विभागाच्या सहाय्यक आयुक्तांनी या घटनेबाबत स्वतंत्र अहवाल तत्काळ सादर करावा असे देखील निर्देश आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांनी दिले.परभणी येथे १० डिसेंबर रोजी घडलेल्या घटनेबाबत वृत्तपत्रात जे वृत्तांकन आले व घटनेनंतरच्या उसळलेल्या दंगलीसंदर्भात तपशीलवार माहिती सादर करण्याचे लेखी पत्र निर्गमित करण्यात आले आहे. ॲड. मेश्राम हे परभणी जिल्हा दौरा लवकरच करणार आहेत.परभणीच्या सामाजिक न्याय विभागाच्या सहाय्यक आयुक्तांनी या घटनेबाबत स्वतंत्र अहवाल तत्काळ सादर करावा असे देखील निर्देश आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांनी दिले.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# शहापूर व मुरबाड तालुका टँकरमुक्त करण्यासाठी 'शिवजल सुराज्य अभियान'

**ठाणे (सम्यक कासारे)** - ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात मुरबाड व शहापूर तालुक्यातील पाणी समस्या सोडविण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत टँकरग्रस्त भागात "शिवजल सुराज्य अभियान" दि. १० डिसेंबर, २०२४ पासून राबविण्यात येत आहे. "शिवजल सुराज्य अभियान" यशस्वीपणे अंमलबजावणी व संनियंत्रणासाठी जिल्हास्तरावर समिती निश्चित करण्यात आली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे समिती अध्यक्ष तथा मुख्य मार्गदर्शक, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार समिती सहअध्यक्ष म्हणून कामकाज पाहणार आहेत. कच्चे बंधारे/ वनराई बंधारे, साखळी सिमेंट बंधारे(नाला गाळ काढणे), के.टी.वेअर/ साठवण बंधारा दुरुस्ती/ नवीन कामे, पाझर तलाव/ गावतलाव दुरुस्ती/ गाळकाढणे/ नवीन कामे, खोल सलग समतळचर/ सलग समातरचर, पिण्यांच्या पाण्याची विहिर गाळ काढणे / दुरुस्ती, जलकुभ गाळ काढणे / नवीन बुडक्या, विंधण विहिरीव्दारे छतावरील पाऊसपाणी संकलन, रिचार्ज शाफट (नळयोजना विहीर स्त्रोत बळकटी करणासाठी), गॅबीयन बंधारे इ. सर्व उपाययोजना 'शिवजल सुराज्य अभियान' अंतर्गत राबवण्यात येणार आहेत.

या सर्व कामांना नियोजित वेळेत पुर्ण करण्यासाठी श्रमदान, पाण्याचे सुयोग्य नियोजन करून गावातील पाणी पातळी वाढवण्यासाठी ग्रामस्थांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे. दि. १० डिसेंबर, २०२४ ते ३० सप्टेंबर, २०२५ पर्यंत अभियान कालावधी असून गाव/पाडयांमध्ये गटविकास अधिकारी यांनी संबधित बीट अभियंता लघुपाटबंधारे विभाग, पाणीपुरवठा विभाग, कृषी सहाय्यक, ग्रामसेवक यांना ग्रामपंचायत निहाय वेळापत्रकानुसार शिवार फेरी करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. गाव/ पाड्यातील पाण्याची पातळी, साठवण क्षमता, स्त्रोत, पावसाच्या पाण्याचे प्रमाण, पावसाचे पाणी साठवण सक्षमता व गावातील पाणी वापर यासंदर्भांतील



सविस्तर माहिती दि. २६ डिसेंबर, २०२४ पर्यंत जिल्हा परिषदेस सादर करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी परिपत्रकाद्वारे दिले आहेत.

जिल्हयात टँकरग्रस्त भागात वर्षभर ४० ते ४५ लिटर प्रत्येक व्यक्तीस पाणी पुरवठा सुरळीतपणे होण्यासाठी जिल्हा नियोजन, आदिवासी उप योजना, बिगर आदिवासी उप योजना, नावीन्य पुर्ण योजना, जलयुक्त शिवार, एमआरईजीएस तसेच जिल्हा परिषद सेस निधी इत्यादी विविध योजनाव्दारे मंजूर निधी तसेच ग्रामपंचायतस्तर पेसा, वितआयोग लोकसहभाग तसेच सीएसआर फंड इत्यादी मधुन स्त्रोत बळकटीकरण तसेच भूजल संवर्धनाच्या योजना लघुपाटबंधारे विभाग, पाणीपुरवठा विभाग, कृषी विभाग, एमआरईजीएस, ग्रामपंचायत व सामाजिक वनीकरण करून अभियान राबविण्यात येणार आहे. अभियान यशस्वीपणे राबवण्यासाठी तालुकास्तरावरुन उत्कृष्ठ नियोजन, अंमलबजावणी व सहाय्य करणाऱ्या ग्रामपंचायतीस "भूजल समृध्द ग्रामपंचायत" पुरस्कार तालुका व जिल्हास्तरावर निवड करून देण्यात येईल अशी माहिती ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून देण्यात आली. या अभियानासाठी एकूण १० प्रकारे कामाचे नियोजन करण्यात येणार असून पुर्न: भरणाचे उद्दीष्ट व पाणी साठवण करण्यासाठी शहापूर तालुक्यात विंधण विहिरीवरील छता वरील पाऊस पाणी संकलन – ४५४ , रिचार्ज शाफट – ५०, गॅगीयन बंधारा – ५०, के.टी. बंधारा – १०, वनराई बंधारे/ कच्चे बंधारे – ५०, सिमेंट नाला बंधराCNB – १५ नियोजित कामे असून त्याद्वारे भूजल पुनर्भरण ३३७ दश लक्ष लिटर तर साठवण १४५ दश लक्ष लिटर पाणी उपलब्ध करून देण्यासाठी कामकाज करण्यात येणार आहे. तर मुरबाड तालुक्यात विंधण विहिरीवरील छता वरील पाऊस पाणी संकलन – १३० , रिचार्ज शाफट – ७५, के.टी.बंधारा – ५, वनराई बंधारे/कच्चे बंधारे – ३५, सिमेंट नाला बंधरा CNB – ७, युजीबी – ३ नियोजित कामे असून त्याद्वारे भूजल पुनर्भरण १४० दश लक्ष लिटर तर साठवण ८१ दश लक्ष लिटर पाणी उपलब्ध करून देण्यासाठी कामकाज करण्यात येणार आहे. शहापूर तालुक्यातील ४३ गाव, १५५ पाडे असे एकूण १९८ गाव/पाड्यात जुन २०२४ अखेर ४२ टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत होता, तर मुरबाड तालुक्यातील १७ गाव, १८ पाडे असे एकूण ३५ गाव/पाड्यात जुन २०२४ अखेर ६ टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत होता. असे एकूण २३३ गाव/ पाडे टँकरग्रस्त होते तर ८२ हजार १०३ बाधित लोकसंख्या होती. ही समस्या लक्षात घेऊन शहापूर व मुरबाड या तालुक्यात टँकर मार्फत पाणी पुरवठा करण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी व लोक सहभागातून पाणी समस्या सोडविण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे.

# जिल्ह्यात सिकलसेल नियंत्रण सप्ताह

**ठाणे (विशाल पाटील)** - राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सिकलसेल आजार नियंत्रण कार्यक्रम आरोग्य संस्थास्तरावर राबविण्यात येत असून जिल्हयामध्ये आरोग्य विभागामार्फत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व तालुक्यांमध्ये सर्व शासकीय आरोग्य संस्था, सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र येथे दि. ११ डिसेंबर, २०२४ पासून ते १७ डिसेंबर, २०२४ हा कालावधी "सिकलसेल नियंत्रण सप्ताह" म्हणून साजरा करण्यात येत आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांच्या सूचनेनुसार प्रत्येक आरोग्य केंद्रामध्ये रुग्णांची तपासणी करून लोकांमध्ये या आजार विषयक जनजागृतीचे कार्यक्रम घेण्यात येत आहेत. यावेळी तपासणी सोबत वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून समुपदेशन व जनजागृती केली जात आहे.




तसेच शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना (वय १२ ते १७) सिकलसेल आजार त्याचे संक्रमण, संभाव्य धोके इत्यादीबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

ठाणे जिल्ह्यामध्ये सिकलसेल आजार आढळून येतो, हा आजार अनुवंशिक असून या आजारावर अद्याप कोणताही कायमस्वरूपी उपचार उपलब्ध नाही. या आजाराने ग्रस्त असलेल्या रोगी व वाहक व्यक्तींवर औषधोपचार करण्यात येत असले तरी या रोगाचा प्रादुर्भाव पुढच्या पिढीमध्ये टाळता यावा यासाठी लोकांमध्ये या विषयी जनजागृती निर्माण करणे आवश्यक आहे, म्हणून दिनांक ११ ते १७ डिसेंबर हा कालावधी ''सिकलसेल नियंत्रण सप्ताह'' म्हणून घोषित करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

सिकलसेल हा आजार आनुवंशिक आजार आहे. सिकलसेल ग्रस्त व्यक्तीला नियमित औषधोपचारांची गरज असते. सिकलसेल वाहक व्यक्ती बाह्यता निरोगी दिसते परंतु असे रुग्ण समाजात रुग्णांची संख्या वाढविण्यास कारणीभूत ठरू शकतात, म्हणून सर्वांनी जागरूक राहून सिकलसेल आजार संदर्भात काळजी घेतली पाहिजे, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात येत आहे. या आजाराची लक्षणे ही अशक्तपणा, रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी होणे, सांधे दुखी, सांधे सुजणे, शरीर पिवळसर होणे, असह्य वेदना होणे, लहान बालकांना वारंवार जंतु संसर्ग होणे, चेहरा निस्तेज दिसणे ही आहेत. या आजाराचे निदान शासकीय आरोग्य संस्थांमध्ये मोफत केले जाते. सर्व शासकीय आरोग्य संस्थेत सिकलसेलची तपासणी मोफत केली जाते. सिकलसेल वाहक व ग्रस्त रुग्णास मोफत समुपदेशन, औषधोपचार व संदर्भ सेवा उपलब्ध आहेत.

सिकलसेल हा आजार रक्तदोष आजार असून सिकल पेशी रक्तक्षय या नावाने ओळखला जातो. या आजारात लाल रक्त पेशींचा आकार विळ्यांसारखा होत असल्याने पेशींची लवचिकता कमी होते. यामुळे गुंतागुंत निर्माण होते. सिकलसेल पेशी आजारामुळे नेहमीची होणारी गुंतागुंत म्हणजे रक्तक्षय (अनिमिया) या आजारावर वेळीच लग्नापूर्वी तपासणी केली तर पुढच्या पिढीला अनुवंशीकतेने होणाऱ्या या आजारापासून आपण वाचवू शकतो, म्हणून लग्न करण्यापूर्वी मुलगा-मुलगी दोघांनीही रक्ताची तपासणी करून घ्यावे, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी केले आहे.

# १४ डिसेंबर पासून नवी मुंबई वाशीत "महालक्ष्मी सरस -२०२४" चे आयोजन

**नवी मुंबई (धनश्री सट्टा)** :- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) च्या वतीने नवी मुंबईत वाशी येथील सिडको एक्झीबिशन सेंटर या ठिकाणी दि. १४ ते २५ डिसेंबर, २०२४ या कालावधीत राज्यस्तरीय "महालक्ष्मी सरस प्रदर्शन-२०२४" चे भव्यदिव्य आयोजन करण्यात येत आहे. अशी माहिती अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी रुचेश जयवंशी, यांनी दिली आहे. ग्रामीण भागातील महिलांना स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून संघटित करुन त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी निर्माण केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून व्यवसायवृध्दी व्हावी असा या प्रदर्शनाचा उद्देश आहे.+

महालक्ष्मी सरसचे नवी मुंबईतील हे दुसरे वर्ष असून, मागील वर्षी सरसला नवी मुंबईकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता. त्याप्रमाणे या वर्षी सुध्दा 'महालक्ष्मी सरस' वाशी येथील सिडको एक्झीबिशन सेंटर या ठिकाणी भरविण्यात येत असल्याने नवी मुंबईकरांना या प्रदर्शनाचा लाभ घेता येणार आहे. 'महालक्ष्मी सरस प्रदर्शन' एक अत्यंत नावीन्यपूर्ण आणि ग्रामीण संस्कृती शहरापर्यंत पोहोचविण्याचे अनोखे व्यासपीठ आहे. या राज्यस्तरीय प्रदर्शनामध्ये साधारण ४७५ स्टॉल आहेत. यामध्ये महाराष्ट्रातील ३७५ आणि देशभरातून साधारण १०० स्टॉल लावण्यात येणार आहेत. प्रदर्शनात राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या सुगरणींचे खमंग आणि रुचकर शाकाहारी व मांसाहारी खाद्यपदार्थांचे ७५ स्टॉलचे मिळून भव्य असे फूड कोर्ट असणार आहे. या प्रदर्शनात अनेक प्रकारच्या कलाकुसर, हातमागावर तयार केलेले कपडे, वुडन क्राफ्ट, बंजारा आर्ट, वारली आर्ट च्या वस्तू असणार आहेत. याशिवाय महिलांच्या आकर्षणाच्या अनेक प्रकारचे दागिणे, लाकडी खेळणी, इतर राज्यातील दुर्मिळ वस्तूंची रेलचेल या प्रदर्शनात पाहायला मिळणार आहे. नवी मुंबई, मुंबई, ठाणे आणि पनवेल शहरातील नागरिकांना प्रदर्शनाचा आरामदायी अनुभव घेता यावा याकरिता संपूर्ण प्रदर्शन वातानुकूलित असणार आहे. त्याचप्रमाणे सहकुटुंब भेट देणाऱ्या कुटुंबांचा विचार करून लहान मुलांना खेळवाडी ( प्ले एरिया) उभारण्यात आला आहे.

# बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्या विदेशी नागरिकांना आश्रय दिल्यास कारवाई



**भाईंदर (सतीश सोनावणे) :** मीरा -भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय हद्दीत बेकायदेशीर वास्तव्य करणारे बांगलादेशी, नायजेरियन नागरिक राहत असल्याचे आढळून येत आहेत. या विदेशी नागरिकांवर पोलिसांकडून वेळोवळी कारवाई केली जात आहे. कारवाई होत असताना या विदेशी नागरिकांना घर भाड्याने देणे किंवा त्यांना कामावर ठेवणे, त्यांना आश्रय देणाऱ्यांवर पोलीस कारवाई करणार असल्याचे पोलीस उपायुक्त प्रकाश गायकवाड यांनी सांगितले आहे. मीरा- भाईंदरमध्ये विविध भागांत नायजेरियन आणि बांगलादेशी नागरिक बेकायदेशीर वास्तव्य करत आहेत. गेल्या आठवड्यात अंमली पदार्थांची विक्री करण्यासाठी आलेल्या दोन नायजेरियन नागरिकांवर कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर पोलिसांनी बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्या सहा बांगलादेशी महिलांवर मीरा रोड, नयानगर आणि नवघर पोलीस ठाणे हद्दीत कारवाई केली आहे. या बांगलादेशी महिलांकडे इकडे राहण्याबाबत कोणतेही पुरावे नसल्याने त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरात दिवसेंदिवस विदेशी नागरिकांचे वास्तव्य वाढत आहे. पोलिसांनी केलेल्या कारवाईमुळे मीरा- भाईंदर शहरात गेल्या अनेक दिवसांपासून विदेशी नागरिक बेकायदेशीररित्या वास्तव करत असल्याचे दिसून येत आहे. त्यांच्यावर पोलिसांकडून कारवाई करण्यात येत आहे. शहरातील नागरिक या विदेशी नागरिकांना बेकायदेशीररित्या घरकाम किंवा इतर कामांसाठी ठेवतात. परंतु, कामावर ठेवताना त्या व्यक्तीचे नाव, गाव आता कोठे राहते, त्या व्यक्तीकडे आपल्या देशात राहण्याचे पुरावे आहेत का? याची तपासणी करत नाहीत, त्यामुळे या लोकांचे वास्तव वाढत आहे.

# वसई – विरार शहरातील वाहनतळाची समस्या जटिल

## आधी पार्किंगला जागा द्या, नंतर टोइंग करा

**वसई (सुचिता देशमुख )** - वसई – विरार शहर महानगरपालिकेकडे ६८ भूखंड राखीव आहे तरी देखील शहरातील वाहनतळाची समस्या जटिल बनू लागली आहेत. शहरात पालिकेकडे वाहनतळ नसल्यामुळे नागरिकांना शहरात मिळेल त्याठिकाणी वाहने उभी करून साहित्याची खरेदीसाठी जावे लागते. उभ्या केलेल्या वाहनांवर वाहतूक पोलिसांडून कारवाई होत असल्याने नागरिकांना दुतर्फा दंड सहन करावा लागत असल्यामुळे नागरिकांनी पार्किंगला जागा द्या, मग टोइंग करा अशी मागणी करण्यात आली आहे. वसई-विरार शहराची लोकसंख्या पालिकेने दिलेल्या माहितीनुसार ३२ लाखांच्या घरात गेली आहे. यामुळे शहरातील रस्त्यावर वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यात गुजरात गॅस कंपनीने आणि जल योजना यांच्या माध्यमातून



दुतर्फा खोदून ठेवलेले आहे. त्यामध्ये शहरातील अवैध फेरीवाले, अवैध रिक्षा स्थानके, दुकानदारांनी वाढवेलेले अवैध शेड यांच्यामुळे वाहतूक कोंडीत भर पडू लागली आहे. त्यात पालिकेने अद्याप नागरिकांसाठी वाहनतळाची सुविधा उपलब्ध केली नसल्यामुळे नागरिकांना नाईलाजास्तव वर्दळीच्या ठिकाणी मिळेल त्या जागेवर आपली वाहने उभी करून सामानाची खरेदी करावी लागत आहे; मात्र उभ्या केलेल्या वाहनांवर वाहतूक पोलिसांकडून कारवाई होत असल्यामुळे वाहन चालक आणि वाहतूक पोलिस असा नवा वाद निर्माण झाला आहे. वसई-विरार शहर पालिकेने शहरातील वाहनतळाची समस्या दूर करण्यासाठी शहरातील १३ ठिकाणे निश्चित करण्यात आली होती. मात्र टेंडर प्रक्रियेसाठी ठेकेदार आले नसल्यामुळे ती प्रक्रिया पुढे राबविता आली नाही. पालिका नागरिकांकडून थकीत असलेल्या करांची न चुकता वसुली करत असते. तसेच शहरात विकासाच्या नावावर नागरिकांची फसवणूक चालू आहे. त्यामुळे पालिकेने वाहन तळांची निर्मिती लवकर करावी, अशी मागणी वाहन चालक तसेच नागरिकांनी केली आहे.

# जल जीवन मिशन कार्यक्रमाचे प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रशिक्षण

**ठाणे (रोहित जैसवाल)** - जल जीवन मिशन कार्यक्रमाचे गावपातळीवर प्रभावी अंमलबजावणीसाठी ग्रामपंचायत स्तरावरील पाणी पुरवठा योजनेचे संचालन, देखभाल व दुरुस्ती आणि सुयोग्य व्यवस्थापन विषयक गाव पातळीवरील भागधारकांचे प्रशिक्षण दि. १६ डिसेंबर २०२४ ते दि. ९ जानेवारी २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. हिमालय इन्स्टिट्यूट फॉर इन्व्हायर्नमेंट इकोलॉजी ॲण्ड डेव्हलपमेंट, संस्था डेहराडून, उत्तराखंड यांच्यामार्फत १ हजार ९७०



प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील पाणी प्रश्न सोडवण्यासाठी प्रशिक्षण तांत्रिकदृष्या उत्तम नियोजन करणे आवश्यक असल्याबाबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी मार्गदर्शन केले आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावरील पाणी पुरवठा योजनेचे संचालन, देखभाल व दुरूस्ती आणि सुयोग्य व्यवस्थापन यासाठी भागधारकांचा सहभाग, तसेच गावपातळीवर पाणी विषयक समस्या वेळेत सोडवण्याच्या उद्देशाने जल जीवन मिशन विभागामार्फत प्रशिक्षणाचे नियोजन करण्यात येत आहे.

ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष, समितीचे सचिव, पाणीपुरवठा कर्मचारी/ जल सुरक्षक, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे (VWSC ) किंवा नळ पाणीपुरवठा योजनेच्या देखभाल व दुरुस्ती साठी निवड केली असल्यास त्या संस्थेचे जसे स्वयंसहाय्यता महिला बचत गट/प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था (Primary Agricultural Co-opretive Socities-PACS) व निवडलेल्या अन्य संस्थेतील सदस्य, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे (VWSC) महिला सदस्य किंवा नळ पाणीपुरवठा योजनेच्या देखभाल व दुरुस्ती साठी निवड केली असल्यास त्या संस्थेचे जसे स्वयंसहाय्यता महिला बचत गट / प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था (Primary Agricultural Co-opretive Socities-PACS) व निवडलेल्या अन्य संस्थेतील महिला सदस्य तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी यांचा सहभाग या प्रशिक्षणात असणार आहे.

# शामराव पेजे महामंडळाच्या थकबाकीदारांनी मुद्दल व व्याज एकरकमी परतावा योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**ठाणे (यश सावंत)** - शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ मर्या. मुंबई यांच्या ठाणे जिल्हा कार्यालयामार्फत विविध कर्ज योजनेंतर्गत जिल्ह्यातील इतर मागस प्रवर्गातील लाभार्थ्यांना स्वयंरोजगाराकरिता अल्प व्याज दराने कर्ज वितरीत करण्यात आले आहे. महामंडळाकडून घेतलेल्या कर्जाची मुदत संपलेल्या लाभार्थींना महामंडळाकडून घेतलेल्या कर्जावर संपूर्ण थकीत व्याज रक्कमेवर लाभार्थ्यांना ५०% सवलत देण्यात येणार आहे. त्याचा लाभ घेवून सर्व



संबंधित लाभार्थ्यांनी थकीत मुद्दल व व्याज एकरकमी परतावा (One Time Settlement) योजनेचा दि.३१ मार्च २०२५ पर्यंत लाभ घेवून कर्ज खाती बंद करुन कर्जमुक्त व्हावे तसेच कायदेशीर कार्यवाही टाळावी. याबाबत संबंधितांनी, शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक निशिकांत नार्वेकर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन महामंडळाच्या ठाणे जिल्हा कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

# ‘पुष्पा’चा तुरुंगवास टळला!



‘पुष्पा’ फेम अल्लू अर्जुनला आज तेलंगणा पोलिसांनी अटक केली होती. हैदराबाद येथील संध्या थिएटरमध्ये झालेल्या चेंगराचेंगरीत एका महिलेचा मृत्यू झाला. याप्रकरणीच अल्लू अर्जुनलाही पोलिसांनी ताब्यात घेतलं. त्याला आधी नामपल्ली कोर्टाने १४ दिवसांची कोठडी सुनावली होती. यानंतर त्याने हायकोर्टात धाव घेतली. आता ‘पुष्पा’ला दिलासा मिळाला आहे. तेलंगणा हायकोर्टाने त्याला अंतरिम जामीन मंजूर केला आहे. यामुळे आता ‘पुष्पा’ च्या चाहत्यांचा जीव भांड्यात पडला आहे.

हा निर्णय देताना न्यायाधीश म्हणाले, “कुटुंबाप्रती आम्हाला सहानुभूती आहे. पण अल्लू अर्जुन एक अभिनेता आहे. त्याला त्याच्या हक्कापासून वंचित ठेवता येणार नाही. नागरिक म्हणून त्यालाही जगण्याचा आणि स्वातंत्र्याचा अधिकार आहे. केवळ एक अभिनेता म्हणून त्याच्यासोबत असं करता येणार नाही.”. तसंच अल्लू अर्जुनच्या वकिलाने युक्तिवाद करताना सांगितले की, ‘अल्लू अर्जुन तिथे आल्याने कोणाचा जीव गेला असं पोलिसांच्या निदर्शनात आलं नव्हतं. साधारणपणे कलाकार आपल्या सिनेमाच्या रिलीजआधी प्रीमिअरला हजेरी लावतातच.’ हे सांगताना वकिलाने शाहरुख खानच्या विरोधात गुजरात हायकोर्ट आणि सर्वोच्च न्यायालयात दाखल केसचा रेफरन्स दिला.

तर दुसरीकडे सरकारी वकिलांनी युक्तिवाद केला की, ‘अल्लू एक अभिनेता असला तरी आता तो एक आरोपी आहे. त्याच्याच उपस्थितीमुळे थिएटरबाहेर इतकी गर्दी जमली आणि ही दुर्घटना घडली.’

हायकोर्टाने जामीन मंजूर करताच अल्लू अर्जुन भावुक झालेला दिसला. आज सकाळीच पोलिसांनी त्याला त्याच्या घरातून ताब्यात घेतले होते. तेव्हा त्याची पत्नी चिंतेती दिसली. याचे व्हिडिओ व्हायरल झाले. मला ना धड नाश्ता करु दिला ना कपडे बदलायचा वेळ दिला अशी तक्रार अल्लू अर्जुनने केली होती.

# कीर्ती सुरेश अडकली लग्नबंधनात



मुंबई : साऊथ अभिनेत्री कीर्ती सुरेशनं अखेर बॉयफ्रेंड अँटोनी थट्टिलबरोबर लग्न केलं आहे. कीर्ती सुरेश आणि अँटोनी हे १५ वर्षांपासून एकमेकांना डेट करत होते.अलीकडेच, कीर्तीनं तिच्या सोशल मीडिया हँडलवर लग्नामधील काही अप्रतिम फोटो शेअर केले आहेत. आता या फोटोवर अनेकजण प्रेमाचा वर्षाव करत असून तिला लग्नासाठी शुभेच्छा देत आहेत. आज १२ डिसेंबर रोजी हिंदू रितीरिवाजांनुसार या जोडप्याचं लग्न केल्यानंतर दोघेही चर्चेत आले आहेत. तसेच उद्या १३ डिसेंबरला ख्रिश्चन रितीरिवाजांनुसार लग्न होणार आहे. लग्नामधील फोटो शेअर करत कीर्तीनं पोस्टमध्ये लिहिलं, 'नायकीच्या प्रेमासाठी.' आता सोशल मीडियावर कीर्ती सुरेशच्या लग्नाची फोटो खूप वेगानं व्हायरल होत आहेत.

कीर्ती सुरेशचं लग्न : कीर्ती सुरेशनं गेल्या महिन्यातच सोशल मीडियाच्या माध्यमातून आपल्या प्रेमप्रकरणाची घोषणा केली होती. लग्नापूर्वी तिनं तिरुमाला वेंकन्ना इथे भेट देऊन आशीर्वादही घेतला होता. किर्ती आणि अँटोनी यांच्या लग्नसोहळा खूप थाटात साजरा झाला आहे. १२ डिसेंबर रोजी कीर्तीनं लग्न करून आपल्या चाहत्यांना एक सुखद धक्का दिला आहे. दरम्यान कीर्ती सुरेशचा 'बेबी जॉन' हा चित्रपट रुपेरी पडद्यावर लवकरच रिलीज होणार आहे. या चित्रपटामध्ये तिच्याबरोबर वरुण धवन असणार आहे. या चित्रपटाच्या माध्यामातून ती बॉलिवूडमध्ये पदार्पण करत आहे. कीर्ती सुरेशचे फोटो व्हायरल झाल्यानंतर आता चित्रपटसृष्टीतील अनेक कलाकार तिला शुभेच्छा देत आहेत.

कीर्तीची सुरेशची प्रेमकहाणी : सध्या कीर्ती सुरेश तीन-चार दिवसांपूर्वी गोव्याला जाताना स्पॉट झाली होती. यानंतर तिनं लग्नाचे काम सुरू झाल्याची पोस्ट देखील शेअर केली होती. दरम्यान कीर्तीनं तेलुगू, तामिळ आणि मल्याळम या चित्रपटांमध्ये काम केलं आहे. तिचा 'दसरा' हा चित्रपट ब्लॉकबस्टर झाला होता. यानंतर तिनं 'भोला शंकर'मध्ये काम केलं. हा चित्रपट देखील खूप गाजला होता. दरम्यान कीर्तीची सुरेशच्या प्रेमकहाणीबद्दल बोलायचं झालं तर ती हायस्कूलमध्ये असताना आणि अँटनी कोचीमध्ये ग्रॅज्युएशन पूर्ण करत असताना त्यांची प्रेमकहाणी सुरू झाली होती. अँटोनी हा एक व्यापारी असून दुबईत राहतो.

# विकास बहल आणि कंगना राणौत 'क्वीन २'साठी पुन्हा येणार एकत्र




मुंबई : अभिनेत्री कंगना राणौत अभिनीत 'क्वीन' आजही लोकांना खूप पसंत आहे. हा चित्रपट रुपेरी पडद्यावर चांगलाच गाजला होता. 'क्वीन' चित्रपटामध्ये काम केल्यानंतर कंगनाला 'क्वीन ऑफ बॉलिवूड'चा टॅग मिळाला होता. आता अनेकजण 'क्वीन' चित्रपटाच्या सीक्वेलची मागणी करत आहेत. आता दिग्दर्शक विकास बहल यांनी देखील या चित्रपटाच्या सीक्वेलला दुजोरा दिला आहे. 'क्वीन'च्या सीक्वेलबद्दलची बातमी समोर आल्यानंतर चाहत्यांमध्ये आनंदाची लाट उसळली आहे. विकास बहल यांनी बॉलिवूडमध्ये 'चिल्लर पार्टी', 'क्वीन', 'सुपर ३०' आणि 'शैतान' यासारखे चित्रपट केले आहेत. 'क्वीन' चित्रपटामधील कंगनाचं राणी पात्र अनेकांना पसंत पडलं होतं.

स्क्रिप्टचे काम पूर्ण झालं : अलीकडेच एका मुलाखतीत, विकास बहल यांनी सांगितलं होतं की,'आम्ही काही काळापासून 'क्वीन २'वर काम करत आहोत.' दरम्यान कंगना राणौत तिची पुन्हा भूमिका पडद्यावर साकारणार आहे. यावर प्रतिक्रिया देताना तिनं इन्स्टाग्राम स्टोरीवर 'हो' लिहिलं होतं. विकास यांनी चित्रपटाच्या सीक्वेलबद्दल खुलासा करत पुढं म्हटलं होतं, 'क्वीन रिलीज होऊन दहा वर्षे झाली आहेत, आता लोक मला 'क्वीन २' बद्दल विचारत असतात. मला असं वाटतं की, 'क्वीन' हा चित्रपट कालच प्रदर्शित झाला होता.' मला सांगायला आनंद होत आहे की, आम्ही आमची कहाणी लिहून पूर्ण केली आहे. त्यामुळे त्याचा सीक्वेल बनवला जाणार आहे.'

विकास बहलनं 'क्वीन' चित्रपटाबद्दल केला खुलासा : यानंतर चित्रपट निर्मात्यानं यावर जोर दिला की, सीक्वल घाईत बनवला जाऊ शकत नाही, कारण स्क्रिप्टनं ओरिजिनल चित्रपटाला न्याय द्यावा अशी त्याची इच्छा होती. त्यानंतर विकास यांनी हसताना सांगितलं की, 'चित्रपट चांगला असेल, आम्ही चांगली नक्कीच कमाई करू, पण चांगली कहाणी असणं खूप गरजेचं आहे.' दरम्यान २०१४मध्ये प्रदर्शित झालेला 'क्वीन' हा चित्रपट २३ कोटीच्या बजेटमध्ये निर्मित झाला होता. या चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर ९५.०४ कोटीची कमाई केली होती. विकास बहल दिग्दर्शित या चित्रपटानं अनेक पुरस्कार पटकावले आहेत. याशिवाय या चित्रपटासाठी कंगनाला देखील राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. 'क्वीन' चित्रपटामध्ये कंगना राणौतबरोबर राजकुमार राव मुख्य भूमिकेत दिसला होता.

# कर्करोगाशी लढा देणाऱ्या हिना खानने शेअर केले फोटो

अभिनेत्री हिना खान सध्या कर्करोगाविरुद्ध लढत आहे. हिनावर उपचार सुरू झाल्यापासून, ती तिच्यावर केल्या जाणाऱ्या उपचारांची माहिती चाहत्यांबरोबर शेअर करत आली आहे. अलीकडेच हिनाने तिच्या इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली, ज्यामध्ये ती मुंबईतील हिवाळयाचा आनंद घेताना दिसत आहे.


‘ये रिश्ता क्या कहलाता है’फेम हीना खानने तिचे नवीन फोटो शेअर केले आहे. या फोटोमध्ये ती तिच्या बाल्कनीत उभी असल्याचे दिसून येते. याच फोटोमध्ये तिने अंगावर उबदार शाल पांघरली असून, डोक्यावर लोकरीची टोपी घातलेली दिसते. हिवाळयातील आल्हाददायी थंडगार वातावरणाचा आस्वाद घेत असलेल्या तिच्या चेहऱ्यावरील तेजस्वी हास्य आशा आणि सकारात्मकतेचा संदेश देते. हिनाने आपल्या कॅप्शनमध्ये शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या अलीकडेच तिने अनुभवलेल्या कठीण काळाबद्दलचा खुलासा केला आहे.



हिनाने इन्स्टाग्रामवर फोटो पोस्ट करीत लिहिले, “गेल्या १५-२० दिवसांचा हा प्रवास माझ्यासाठी शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या खूप कठीण होता. या प्रवासात माझ्या शरीरावर जखमाही झाल्या; पण मी घाबरून न जाता, त्याला सामोरी गेली. मी लढले, आणि आजही मी लढतेय.”

हिनाने वाईट काळातही आपण जिद्द ठेवायला हवी आणि या काळातही आनंद शोधायला हवा, असे सांगितले. ती म्हणाली, “सर्व वेदना आणि इतर गोष्टींना सामोरे जाण्यासाठी, मला सकारात्मकतेचं चक्र सुरू ठेवण्यासाठी या आशेने मुद्दाम हसत राहावं लागतं, की खरा आनंद नैसर्गिकरीत्या येईल.

# पुष्पा २ मधील श्रीलीला वयाच्या २१ व्या वर्षी आई झाली




बॉलीवूड अभिनेत्री सुष्मिता सेनने वयाच्या अवघ्या २१व्या वर्षी आपली मुलगी दत्तक घेऊन सर्वांना आश्चर्यचकित केले होते. आजच्या काळात प्रत्येकजण अभिनेत्रीच्या या कामाचे कौतुक करताना दिसत आहे, पण तुम्हाला माहित आहे का की सुष्मिता सेन व्यतिरिक्त अशा अनेक अभिनेत्री आहेत ज्यांनी या पद्धतीने काम केलं आहे. नुकताच पुष्पा २ हा चित्रपट प्रदर्शित झाला असून या चित्रपटातील एका सुंदरीने वयाच्या २१ व्या वर्षी दोन मुले दत्तक घेऊन सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला आहे. पुष्पा २ मधील आयटम नंबरने देशभरात प्रसिद्ध श्रीलीलाबद्दल बोललं जात आहे.

अवघ्या २१ व्या वर्षी दोन मुलांची आई सोशल मीडिया श्रीलीलाशी संबंधित रंजक माहितीने भरलेला आहे. चाहत्यांना देखील अभिनेत्रीबद्दल वाचण्याची आवड आहे, परंतु तुम्हाला माहित आहे का? की श्रीलीला वयाच्या २१ व्या वर्षी दोन मुलांची आई बनली होती. एक उत्कृष्ट अभिनेत्री आणि नृत्यांगना असण्यासोबतच श्रीलीला एक सुंदर व्यक्ती देखील आहे. लोकांची मते बाजूला ठेवून ही अभिनेत्री अवघ्या २१ व्या वर्षी दोन मुलांची आई बनली. श्रीलीलाने अद्याप लग्न केलेले नाही. अभिनेत्रीच्या अफेअरच्या बातम्या सतत येत असतात, मात्र आजपर्यंत तिचे नाव कोणाशीही पक्के झालेले नाही. तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की श्रीलीलाने इतक्या लहान वयात दोन मुले दत्तक घेतली होती. २०२२ मध्ये जेव्हा श्रीलीला अनाथाश्रमात गेली तेव्हा दोन अपंग मुलांना पाहून अभिनेत्री तिथे थांबली. श्रीलीलाने या अनाथाश्रमातून १०० महिन्यांचा गुरु आणि एक मुलगी शोभिता यांना दत्तक घेतले होते.

# प्रियांका चोप्राने सांगितलं ‘क्रिश’ चित्रपटासाठी तिची निवड कशी झाली

बॉलीवूडची देसी गर्ल प्रियांका चोप्रा सध्या हॉलीवूडमध्ये तिच्या अभिनयाची जादू दाखवत आहे. प्रियांका बॉलीवूडपासून दूर असली तरी तिचे आधीचे चित्रपट आजही प्रेक्षकांच्या आठवणीत आहेत. प्रियांका कोणतेही पात्र अगदी चोखपणे साकारते. त्यामुळे प्रत्येक कामासाठी तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत असतो. प्रियांकाचा ‘क्रिश’ चित्रपट तुम्ही सर्वांनी पाहिलाच असेल. या चित्रपटासाठी तिची निवड करताना राकेश रोशन यांनी तिला एका व्यक्तीवर अंत्यसंस्कार सुरू असताना पाहिले होते. अभिनेत्रीने स्वत: याबद्दल सांगितले आहे.

राकेश रोशन दिग्दर्शित ‘क्रिश’ चित्रपट २००६ मध्ये रुपेरी पडद्यावर आला होता. त्यामध्ये अभिनेत्री प्रियांका चोप्रा व हृतिक रोशन यांनी मुख्य भूमिका साकारल्या होत्या. त्या काळी हा ॲक्शन चित्रपट बॉक्स ऑफिसवर तुफान गाजला. तरुणांनाच नाही, तर अगदी लहान मुलांनासुद्धा या चित्रपटाने भुरळ घातली होती. नुकतीच प्रियांका ‘रेड सी इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल’ (RSIFF)



या आंतराष्ट्रीय फिल्म फेस्टिवलमध्ये दिसली. त्यावेळी तिने ‘क्रिश’ चित्रपटासाठी तिची निवड कशी झाली याची आठवण सांगितली.

‘क्रिश’ चित्रपटासाठी अशी झाली प्रियांकाची निवड

सफेद रंगाचे कपडे परिधान करून एका व्यक्तीच्या अंत्यसंस्कारासाठी आलेल्या प्रियांकाने राकेश रोशन यांचे लक्ष वेधले होते. तिचा साधेपणा पाहून राकेश रोशन यांना ती आपल्या ‘क्रिश’ चित्रपटात मुख्य अभिनेत्रीची भूमिका साकारण्यासाठी योग्य आहे, असे वाटले. त्यांनी लगेचच दिग्दर्शक अब्बास मस्तान यांना प्रियांकाचे ‘ऐतराज’ चित्रपटातील काही फोटो दाखवण्यास सांगितले.

प्रियांकाने सांगितले, “मला भीती वाटली की, या चित्रपटामध्ये मला घेतलं जाणार नाही. कारण- ‘ऐतराज’मध्ये माझी भूमिका वेगळी होती. तसेच प्रिया हे पात्र फार साधं होतं. त्यामुळे मला ही भूमिका मिळणार नाही, अशी भीती माझ्या मनात होती.”

“मात्र, राकेश रोशन यांनी फक्त ‘ऐतराज’मधील माझी भूमिका न पाहता, माझं काम पाहिलं.”, असं प्रियांका म्हणाली. पुढे तिने सांगितलं, “राकेश रोशन म्हणाले, मी तुम्ही साकारलेली भूमिका पाहत नव्हतो, मी हे पाहत होतो की, तुम्ही किती प्रामाणिकपणे तुमच्या कामाला न्याय देत आहात. तुम्ही एक हरहुन्नरी अभिनेत्री आहात आणि मला माहीत आहे की, तुम्ही कोणतंही पात्र अगदी सहज साकारू शकता.” ‘क्रिश’मध्ये झळकल्यानंतर प्रियांका पुढे ‘क्रिश ३’मध्येही प्रिया हे पात्र साकारताना दिसली.


प्रियांका चोप्राच्या कामाबद्दल बोलायचे झाल्यास, तिने बॉलीवूडमध्ये सुपरहिट ठरलेल्या अनेक चित्रपटांत काम केले आहे. ‘मुझसे शादी करोगी’, ‘किस्मत’, ‘डॉन’, ‘बर्फी’, ‘अग्निपथ’, ‘दिल धडकने दो’ अशा अनेक चित्रपटांमध्ये तिने काम केले आहे.

# मराठी चित्रपट ‘पाणी’ ‘या’ ओटीटी प्लॅटफॉर्मवर झाला प्रदर्शित, प्रियांका चोप्राचे आहे खास कनेक्शन

बॉलीवूड अभिनेत्री प्रियांका चोप्राची निर्मिती असलेला मराठी चित्रपट ‘पाणी’ ओटीटीवर प्रदर्शित करण्यात आला आहे. प्रियांका चोप्राने तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीच्या माध्यमातून ही बातमी चाहत्यांना दिली आहे. आदिनाथ कोठारे दिग्दर्शित पहिला चित्रपट ‘पाणी’ आता प्रेक्षकांना घरबसल्या पाहता येणार आहे.

प्रियांका चोप्राने तिच्या इन्स्टाग्रामवर स्टोरीज पोस्ट केल्या आहेत. त्यात पाणी चित्रपटाचे पोस्टर पाहायला मिळते. हा चित्रपट आता प्राइम व्हिडीओ या ओटीटी प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहे,






असं त्यात लिहिलं आहे.

नितीन दीक्षित यांनी लिहिलेल्या ‘पाणी’मध्ये अदिनाथ कोठारे, रुचा वैद्य, सुबोध भावे, रजित कपूर, किशोर कदम, नितीन दीक्षित, सचिन गोस्वामी, मोहनाबाई, श्रीपाद जोशी आणि विकास पांडुरंग पाटील यांनी काम केलं होतं. नेहा बडजात्या आणि दिवंगत रजत बडजात्या, प्रियांका चोप्रा जोनास आणि डॉ. मधु चोप्रा यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे तर महेश कोठारे आणि सिद्धार्थ चोप्रा या प्रकल्पाचे सहयोगी निर्माते आहेत. १८ ऑक्टोबर रोजी ‘पाणी’ चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला होता.

‘पाणी’ हा चित्रपट पाणीटंचाईच्या महत्त्वाच्या समस्येवर भाष्य करतो. गावात पाणी आणून किमान पाण्याच्या बाबतीत गावाला स्वावलंबी करणाऱ्या नांदेडमधल्या नागदेरवाडी गावातील हनुमंत केंद्रे यांची वास्तव कथा या चित्रपटात दाखवण्यात आली आहे. चित्रपटाला सिनेमागृहांमध्ये फार चांगला प्रतिसाद मिळाला नव्हता; आता ओटीटीवर तो प्रेक्षकांना आकर्षित करतो की नाही, ते पाहणं महत्त्वाचं ठरेल.




**मेष** – सकारात्मक ऊर्जा आणि उत्साह मिळेल. तुमचे काम व्यवस्थित होईल. इतरांच्या मदतीला हजर राहाल. आर्थिक बाबतीत सावध राहा.

**वृषभ** – आपल्या कुटुंबातील काही मुद्दे तुमचे मन व्यस्त ठेवू शकतात. आपल्या कार्यक्षेत्रात प्रगती कराल. संयम ठेवा आणि संवाद साधा.

**मिथुन** – शब्दकला किंवा संवाद कौशल्य प्रभावी ठरेल. महत्त्वाचे निर्णय घेण्याचे क्षण येऊ शकतात. वैयक्तिक जीवनात संवाद महत्त्वाचा ठरेल.

**कर्क** – आरोग्याची काळजी घ्या. घरातील वातावरण शांत असेल. कुटुंबासोबत वेळ घालवाल. नवीन गोष्टीची सुरुवात यशस्वी होईल.

**सिंह** – तुमच्या कार्याच्या बाबतीत सकारात्मक परिणाम मिळू शकतात. मित्र-मैत्रिणींशी चांगला संवाद होईल. वाहन जपून चालवा.

**कन्या** – काही मुद्यांवर तुमचे मन थोडे कन्फ्युज्ड असू शकते. त्यामुळे शांतपणे विचार करा. तुमच्या कामात तुम्हाला एक नवा दृष्टिकोन मिळेल.

**तूळ** – प्रेम, कुटुंबाच्या बाबतीत काही स्पष्टीकरणांची आवश्यकता असू शकते. विविध कार्यांत व्यस्त असाल. कामात चांगले प्रदर्शन कराल.

**वृश्चिक** – मानसिक शांतीसाठी थोडा वेळ द्यावा. अत्याधिक मेहनतीचे चांगले परिणाम दिसू शकतात. कामात अपेक्षित प्रगती साधाल.

**धनु** – तुम्ही मानसिकदृष्ट्या सशक्त व्हाल. कौटुंबिक सौख्याला प्राधान्य द्याल. तुमच्या आसपास सकारात्मक वातावरण निर्माण करा.

**मकर** – काही महत्त्वाचे निर्णय घेऊ शकता. कामामध्ये क्षुल्लक कारणावरून मानसिक तणाव असू शकतो. आध्यात्मिक ओढ वाढेल.

**कुंभ** – अत्यधिक सामाजिक होऊन इतरांना मदत करू इच्छिता. तुमचे कार्यक्षेत्र आणि आरोग्य दोन्ही चांगले राहतील. चिंता करणे टाळा.

**मीन** – तुमचे लक्ष एकाग्र ठेवून काम करू शकाल. आपल्या कार्यक्षेत्रात नवीन संधी मिळू शकतात. जोडीदाराचा योग्य तो आदर राखा.

# तीव्र चढाव अरुंद घाट माथेरान मिनी बस साठी ठरतोय डोकेदुखी

माथेरान (विशाल पाटील) - माथेरान मिनी बसचे स्वप्न सन २००८ ला पूर्ण होत असताना अनेक संघर्षाचे एक कहाणी सर्वांना ठाऊक आहे मिनी बस सूरू होऊन सोळा वर्षे उमटले तरी मिनी बसचे रडगाणे केवळ घाटातील अरुंध वळणे हेच मोठे डोकेदुखी ठरत आहे. सर्वसामान्य लोकांना स्वस्त आणि सुरक्षित प्रवासाची हमी असणाऱ्या मिनी बस जुन्या झाल्याने अनेकदा घाट रस्त्यात बंद पडण्याच्या घटना घडत असतात त्यामुळे प्रवाशांना नाहक मानसिक आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागते .काही महिन्यापूर्वी नविन मिनी बस खरेदी साठी आमदार महेंद्र थोरवे यांनी तत्कालीन पालकमंत्री उदय सामंत याच्या दालनात बैठक आयोजित केली होती त्या वेळी जिल्हा नियोजन मंडळातून निधी देण्याचे तत्त्व मंजुरी दिली होती , तसा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना निवासी जिल्हाधिकारी रायगड योगेश म्हसे यांना दिल्या होत्या परंतु त्याचं दरम्यान निवडणुका जाहीर झाल्या त्यामुळे मिनी बस मात्र कागदोपत्री राहिली. १० सप्टेंबर रोजी मनोज खेडकर,



शिवाजी शिंदे , सुनिल शिंदे यांनी निवासी जिल्हाधिकारी संदीप शिर्के यांची भेट घेऊन माथेरान करिता तातडीने नवीन मिडी सेवा उपलब्ध करून देण्याची निकड लक्षात आणून दिली. त्यानुसार महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी अशोक लेलँड कंपनीच्या बसची चाचणी घाटात घेतली परंतु सदर बसची लांबी जास्त असल्याने ती बस घाटात नापास झाली. घाटामध्ये नऊ मीटर आनी त्यापेक्षा कमी लांबीची व जास्त इंजिन क्षमतेची बस आवश्यक आहे. हे महामंडळ अधिकाऱ्यांना मनोज खेडकर यांनी सांगून ३२ सीटर आयशर कंपनीच्या कमी लांबीच्या बस ची मागणी केली .सध्या महामंडळाकडे नविन ई बस उपलब्ध आहेत परंतु माथेरानमध्ये ही बस चार्जिंग पॉइंट नसल्याकारणाने या बस चालू करू शकत नाही सध्या महामंडळाकडे असलेल्या ई-बस चालू करण्यास महामंडळ तयार आहे त्या संदर्भातच आज महामंडळाच्या उपव्यवस्थापक यामिनी जोशी नियंत्रण समिती क्रमांक १ व दीपक भोडे विभाग नियंत्रक तसेच माने यंत्र अभियंता, त्यांचे सहकारी यांनी आज माथेरान मद्ये येऊन घाट रस्ता व जागेची पाहणी केली व माथेरान नगरपरिषद मुख्याधिकारी राहुल इंगळे यांची भेट घेऊन माथेरान मधे मिनी बस चार्जिंग पॉइंट जागा उपलब्ध करून देण्यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली त्या संदर्भात मुख्याधिकारी मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी सकारात्मक चर्चा करून महामंडळाचा प्रस्ताव आल्यानंतर विचार करण्यात येईल असे आश्वासक उत्तर महामंडळाच्या उप विभागीय अभियंताना यामिनी जोशी यांना देण्यात आले, त्यामुळे आता महामंडळ नगरपालिकेकडे कधी प्रस्ताव देते यावरच माथेरानची नवीन ई मिनीबस सुरू होण्याचे आशा अवलंबून आहेत.

# ४१ अनधिकृत इमारती बांधणारा भूमाफिया सक्रीय

## नायगाव मध्ये पुन्हा बेकायदेशीर चाळींचे काम सुरू

वसई (सतीश सोनावणे) - नालासोपारा येथे ४१ अनधिकृत इमारती बांधून चर्चेत आलेला भूमाफिया आणि बविआचा माजी नगरसेवक सिताराम गुप्ता नायगाव मध्ये बेकायदेशीर चाळी बांधत असल्याचे उघड झाले आहे. सागरी किनारा नियंत्रण क्षेत्राचे उल्लंघन करून तसेच तिवरांच्या झाडांची कत्तल करून बेकायदेशीर चाळी बांधल्या जात असल्याच्या तक्रारी करण्यात आल्या आहेत. नालासोपारा पूर्वेच्या अग्रवाल नगरी येथील विविध विकासकामांसाठी आरक्षित असलेल्या ४१ अनधिकृत इमारतींचे प्रकरण सध्या गाजत आहे. सर्वोच्च न्यायालयने या इमारती बेकायदेशीर ठरवल्यानंतर वसई विरार महापालिकेने त्यावर कारवाई सुरू केली आहे. या ४१ इमारतीत २ हजारांहून अधिक कुटुंबे रहात असून त्यातील रहिवाशी बेघर होणार आहेत. आता पर्यंत ७ इमारती पाडण्यात आल्या असून ८ वी इमारत खाली करण्यात आली आहे. या इमारतींमधील ५०



हून अधिक कुटुंबे रस्त्यावर आली आहे. त्यामुळे सर्वत्र संताप व्यक्त होत आहे. या अनधिकृत इमारती बांधणारा भूमाफियास सिताराम गुप्ता याच्यावर कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे. मात्र रहिवाशी बेघर होत असताना सिताराम गुप्ता मात्र मोकाट असून तो नव्याने बेकायदेशीर चाळी बांधत असल्याचे समोर आले आहे. नायगाव पूर्वेच्या जुचंद्र येथील भूमापन क्रमांक २८३ ही जागा सागरी नियंत्रण क्षेत्रात (सीआरझेड) मध्ये येते. ही जागा सिताराम गुप्ता याने विकत घेतली असून त्यावर बेकायदेशीर चाळी बांधत आहे.

SPORT

# 'Bumrah Combines The Best Of Lillee & Roberts': Greg Chappell Praises World No. 1 Test Bowler

**New Delhi -** Legendary Australian batter Greg Chappell, who also served as head coach of the Indian men's cricket team from 2005 to 2007, has reserved big praise for star Indian fast bowler Jasprit Bumrah. According to 76-year-old Chappell, who scored 7110 runs in 87 Tests for the Baggy Greens during his 14-year-long international career, the 31-year-old pacer, who sits at No. 1 position in the ICC Test bowler's rankings, is a mixture of legendary Australian pacer Dennis Lillee and West Indies fast bowling great Andy Roberts.

"Among the modern era's firebrands, Jasprit Bumrah has emerged as a compelling figure, inviting comparisons not only to these stalwarts but also to current South African champion Kagiso Rabada," Chappell wrote in his column for The Sydney Morning Herald.









"I have always said that Dennis Lillee and Andy Roberts were the most complete fast bowlers that I faced. How does Bumrah, with his unorthodox action and masterful control, measure against these two and the other titans of modern fast bowling?" he further asked.

"Bumrah, though less overtly combative, channels Lillee's ability to unsettle batsmen. His deadly yorkers and disconcerting bounce—especially with his unorthodox release point and trajectory—echo Lillee's capacity to dictate terms. Bumrah's quiet intensity and precision make him a nightmare, much like Lillee's unrelenting aggression."

"Bumrah shares Roberts' cerebral approach. Both bowlers use subtle variations to outfox batsmen, relying on strategy rather than brute force. Bumrah's spell in the 2018 Boxing Day Test against Australia—culminating in 6-33—was a modern echo of Roberts' game-changing bursts," he added.

Since making his Test debut for India in 2018 against South Africa at Newlands in Cape Town, the 31-year-old cricketer from Ahmedabad has picked up 185 wickets in 42 matches played so far. He has played 30 Tests outside India and has 138 wickets to his name in those matches.

"Bumrah mirrors this versatility. With 151 wickets at an average of 21.03 in just 30 Tests, his ability to excel in diverse conditions recalls Marshall's dominance. Bumrah's reverse swing on abrasive surfaces and his ability to seam and swing the ball under cloudy skies have been pivotal, evoking the same uncertainty that batsmen faced against Marshall. As Ian Botham famously remarked of Marshall, "He gave you no respite." Today, batsmen echo similar sentiments about Bumrah," wrote Chappell.

# West Indies' Batter Amir Jangoo Breaks Record Of Scoring Fastest Century On ODI Debut





**New Delhi -** Wicketkeeper-batter Amir Jangoo made his international debut for the West Indies on Thursday (December 12) against Bangladesh during an ODI match that was played at the Warner Park in Basseterre, St. Kitts. The 27-year-old cricketer from Trinidad came out to bat at No. 6 for the Men in Maroon and scored a brilliant century. He remained unbeaten on 104 runs from 83 balls, and during his stay at the crease, the left-handed batter hammered 6 fours and 4 sixes. He added 132 runs for the fifth wicket with Keacy Carty (95 runs from 88 balls) and an unbeaten 91 runs for the seventh wicket with Gudakesh Motie (44 runs from 31 balls) to help West Indies chase down the target of 322 runs in 45.5 overs and win the third ODI by four wickets.

In the final match of the bilateral series, Jangroo completed his century with a six on the 80th ball of his innings. By crossing the 100-run mark, Jangroo became only the second West Indies batter after legendary Desmond Haynes to score a century on ODI debut. Haynes, who finished his career with 8648 runs to his name in 238 ODIs for the two-time ODI World Cup winners, made his ODI debut against Australia in St John's on February 22, 1978, and scored 148 runs from 136 balls.

# SMAT 2024: Run machine Ajinkya Rahane decimates Baroda, powers Mumbai to final

**New Delhi -** Ajinkya Rahane delivered a batting masterclass, smashing a scintillating 98 off 56 balls to power Mumbai into the Syed Mushtaq Ali Trophy (SMAT) final with a commanding six-wicket win over Baroda at the M. Chinnaswamy Stadium, Bengaluru, on Friday.





Rahane, who has been in phenomenal form throughout the tournament, once again proved why he is regarded as one of India's finest on the domestic circuit. KKR's new recdecorated with 11 boundaries and five towering sixes, laid the foundation for Mumbai's successful chase of Baroda's 158/7, achieved with 16 balls to spare. The Mumbai opener, however, fell just short of a well-deserved century. With the team needing just one run for victory, Rahane's attempt to finish in style ended in disappointment as he skied a delivery to be caught behind. Yet, the damage had been done, and Mumbai cruised to their second SMAT final.

Captain Shreyas Iyer provided stellar support, blasting a 30-ball 46 in a crucial 88-run partnership with Rahane for the second wicket. Iyer's knock, featuring three sixes and four fours, kept Mumbai well ahead of the required run rate. Later, contributions from Suryakumar Yadav (19) and Suryansh Shedge, who finished the chase with a six, sealed the comprehensive win.

Earlier, Mumbai's disciplined bowling unit set the tone by restricting Baroda to a modest total. Electing to bat under cloudy skies, Baroda started positively with Krunal Pandya (30 off 24) and opener Shashwat Rawat (33 off 29) taking the score to 73/1 in nine overs. However, a sharp spell from Suryansh Shedge, who dismissed Krunal, triggered a dramatic collapse. Baroda slipped from 73/1 to 103/6, with Mumbai's bowlers maintaining relentless pressure. Late cameos from Atit Sheth (26* off 17) and Shivalik Sharma (21 off 12) injected some momentum, adding 53 runs in the final five overs, but their efforts were insufficient to challenge Mumbai's in-form batting.

Brief Scores: Baroda 158/7 in 20 overs (Shashwat Rawat 33, Shivalik Sharma 36*; Suryansh Shedge 2-11, Tanush Kotian 1-16) lost to Mumbai 164/4 in 17.2 overs (Ajinkya Rahane 98, Shreyas Iyer 46) by 6 wickets.

# Sachin paid for my surgeries: Kambli backtracks from previous claims, credits Tendulkar for helping him

**Mumbai -** Vinod Kambli and Sachin Tendulkar reunited during the memorial event for their late childhood coach Ramakant Achrekar recently. At the event, Kambli's health conditions made heads turn as he looked reasonably weak. His health became a huge talking point in the Indian cricket fraternity. In a recent interview, Kambli opened up on his health issues and backtracked from his previous claims of Tendulkar -- his childhood friend -- not helping him in troubled times. The former cricketer explained why he accused Tendulkar, in an interview in 2009, and credited Master Blaster for always being his side, even paying for his surgeries.

In a recent interaction, Kambli revealed that he is battling a severe urinary infection and is



determined to overcome his struggles. He lauded his family for their constant support and is 'grateful' for having a friend like Tendulkar.

On the Vicky Lalwani Show, he said, "In that moment (recalling his 2009 remark of criticising Tendulkar), I felt Sachin wasn't helping. I was deeply frustrated. But in reality, Sachin has done everything for me, including covering the costs of my two surgeries in 2013. We've reconciled, and our childhood bond has prevailed."

He further mentioned, "Sachin taught me the game. I have made nine comebacks in my career. As athletes, we face injuries and setbacks, but we understand the game's reality. When we face a setback, it hurts just as much."

Kambli concluded, "My journey wasn't perfect, but I gave it my all. I'm grateful for the support of my family and friends like Sachin."

Kambli represented India in 17 Tests and 104 ODIs, spanning from 1991-2004. He ended with 1,084 runs in Tests and 2,477 ODI runs. While he had a dream start to his career, inconsistencies, controversies both on and off the field derailed his journey. Tendulkar, on the other hand, kept rising up the ladder and played for India from 1989-2013, ending with over 34,000 international runs and 100 hundreds overall.

# पार्किंग धोरणालाच 'रेड सिग्नल'!



## 'या'वर काम सुरू

- पालिकेच्या २४ विभागांतील वाहनतळ व्यवस्थापन आराखडा
- प्रस्तावित सुधारणा नगर विकास खात्याच्या मान्यतेकरिता सादर
- वाहनतळामध्ये केंद्रीय संगणक प्रणालीची रचना
- हार्डवेअर व्यवस्थेद्वारे 'मुंबई पार्किंग इंटरफेस'चे (एमपीआय) काम प्रगतिपथावर
- एम/पूर्व विभागात भूमिगत वाहनतळांच्या प्रस्तावाबाबत पडताळणी सुरू
- नवीन वाहनतळ संकल्पनेकरिता बनवलेल्या चिन्हाला मान्यता
- दररचनेसह तयार केलेले वाहनतळ धोरण मान्यतेच्या प्रक्रियेत

## 'या'वर काम अपेक्षित ?

- नवीन दररचनेत बृहन्मुंबई वाहनतळ धोरणाची (बीपीपी) अंमलबजावणी करणे.
- मुंबई पार्किंग पूलमध्ये अधिकाधिक संस्थांचा अंतर्भाव करणे.
- प्राधिकरणाच्या कायदेशीर स्थापनेची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सरकारला सहाय्य करणे.
- 'एमपीआय'करिता सॉफ्टवेअर व हार्डवेअर, नागरिकांकरिता ॲप तसेच विविध पार्किंग व्यवस्थांकरिता केंद्रीय खुली एपीआय प्रणाली, वाहनतळ
- उपलब्धतेसह बुकिंग आणि शुल्क देण्यासाठी नागरिकांना ऑनलाइन सुविधा उपलब्ध करणे.
- विभागीय वाहनतळ व्यवस्थापन आराखड्याची प्रायोगिक तत्त्वावर अंमलबजावणी करून त्याअनुषंगाने सर्व विभागांमध्ये आराखड्याचा विस्तार करणे. तसेच या बाबींचा वाहनतळ धोरणात समावेश करणे आवश्यक असल्याचे जाणकारांचे मत आहे.

● मुंबई, विशाल कारंडे :

मुंबई महानगरपालिकेच्या पार्किंग धोरणाची मुदत मार्च २०२२ला संपली असून, नवीन धोरण राज्यशासनाच्या मंजुरीअभावी रखडले आहे. त्यामुळेच पार्किंगच्या जागा निश्चितीबरोबर मुंबईतील पार्किंगच्या नियोजनालाच खीळ बसल्याचे आता स्पष्ट झाले आहे.

वर्दळीच्या रस्त्यांवर दोन्ही बाजूला अवैध पार्किंग, पे अँड पार्किंगच्या जागेत अनाठायी होणारी लूट, वाढत्या वाहनांच्या बदल्यात पार्किंगसाठी उपलब्ध नसलेल्या जागा यावर उत्तर शोधण्यासाठी पालिका प्रशासनाचे प्रयत्न सुरू आहेत. गेल्या अडीच वर्षांपासून पालिकेच्या रस्ते व वाहतूक विभागाकडून राज्य सरकारकडे या धोरणाबाबत पाठपुरावा सुरू आहे. मात्र, त्याबाबत सरकारकडून टाळाटाळ केली जात आहे. या अनास्थेमुळे शहरातील वाढती पार्किंग समस्या तातडीने सोडवण्याच्या दृष्टीने पालिकेने मुंबई वाहनतळ प्राधिकरण (एमपीए) स्थापन करण्याचे निश्चित केले आहे. विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०३४ मधील विशेष तरतुदी अंतर्गत या प्राधिकरणाची स्थापना करण्यात येणार आहे. यामध्ये विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांचा समावेश करण्यात आलेला असून, त्याद्वारे पालिकेच्या २४ विभागांतील वाहनतळ व्यवस्थापनाचा आराखडा तयार केला जाणार आहे. या प्राधिकरणामुळे मुंबईकरांची सुरक्षा, सुलभता व सार्वजनिक हित वृद्धिंगत होईल, असा विश्वास पालिका प्रशासनाकडून व्यक्त होत आहे. हा प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी राज्य सरकारकडे पाठवण्यात आला असून, मात्र मागील दीड वर्षापासून तोही लालफितीत अडकून पडला आहे. विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये अनिवार्य केल्याप्रमाणे, रस्ते व वाहतूक विभागामार्फत मुंबई वाहतूक पोलिस आणि राज्य परिवहन विभागाच्या भागीदारीने, वाहतूक व्यावसायिक, नगर रचनाकार व संकल्पचित्रकार, धोरण संशोधक, तज्ज्ञ आणि भौगोलिक माहिती प्रणाली (जीआयएस) तंत्रज्ञ यांच्या टीमसह मुंबई वाहतूक प्राधिकरणाच्या स्थापनेचे काम हाती घेण्यात आले आहे. कामाच्या आखणीनुसार २०१९ पासून या टीमने ९ बाबींवर काम सुरू केले असून, पुढील वर्षभरात ५ बाबींवर काम केले जाणार आहे.

# आरोग्य विभागाच्यावतीने 'कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र' मोहीम राबवणार

● ठाणे, रोहित जैसवाल :



केंद्र शासनाने २०२७ पर्यंत कुष्ठरोग रुग्णांची संख्या शुन्य करण्याचे धोरण आखले आहे. त्याअनुषंगाने आरोग्य विभागाच्यावतीने दि. १६ डिसेंबर, २०२४ ते २० डिसेंबर, २०२४ या कालावधीत ठाणे जिल्हा ग्रामीण व शहरी विभागामध्ये कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) ही मोहीम राबविण्यात येणार आहे. ठाणे जिल्ह्यात एप्रिल २०२४ ते नोव्हेंबर २०२४ अखेर ६०१ कुष्ठ रुग्णांची नोंद कुष्ठरोग विभागाने केली आहे. वेदना नसल्याने अनेकवेळा रुग्ण याआजाराकडे दुर्लक्ष करतात त्यामुळे याकडे दुर्लक्ष न करता वेळेत निदान करावयाचे आव्हान कुष्ठरोग विभागाकडून करण्यात येत आहे.

ठाणे जिल्ह्यात आश्रमशाळा -४३, वसतिगृह - २८, बांधकामाच्या जागा - ५९३, विटभट्टी - ७३७, कारागृह – ३, अति जोखमीची ठिकाणे – १ हजार ९७६ येथील कामगार यांचे आशा व स्वयंसेवका मार्फत सर्वेक्षण करण्यात येणार आहे. त्वरित कुष्ठरोगाचे निदान करून नजदिकच्या शासकीय संस्थेत / आरोग्य केंद्रात त्यांना बहुविध औषधोपचाराखाली आणण्यात येणार आहेत. या मोहिमेचे मूळ उद्दीष्ट वंचित विभागातील कुष्ठ रुग्णांना शोधून संसर्गाची साखळी खंडित करणे आहे.

कुसुम मोहीम प्रभावीपणे राबविण्यासंदर्भात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग) डॉ. गीता काकडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी जिल्ह्यातील सर्व यंत्रणेला निर्देशित केले आहे. तसेच आरोग्य कर्मचारी, आशा व स्वयंसेवक यांना प्रशिक्षण देण्यात आले असून जिल्ह्यातील मनुष्य बळाची माहिती घेवून त्यानुसार सुक्ष्म कृती आराखडा बनवून त्या प्रमाणे कुष्ठरोग शोध मोहिमेचे नियोजन करण्यात आलेले आहे.

# शेतीचे नुकसान करणाऱ्या गव्यांचा बंदोबस्त करा

## पन्हाळ्याच्या शेतकऱ्यांची वनविभागाकडे मागणी

● कोल्हापूर, प्रथमेश चव्हाण :

पन्हाळयाच्या पायथ्याशी असलेल्या सोमवार पेठ, तुरुकवाडी, लक्ष्मी कुरणासह परिसरातील शेतकऱ्यांनी त्यांच्या सुमारे ३५०० एकर शेतीच्या गव्यांमुळे झालेल्या नुकसानीला पायबंद घालण्याची मागणी उपवनसंरक्षक जी. गुरु प्रसाद यांच्याकडे केली. त्यावर यासंदर्भात या शेतकऱ्यांसाठी चेन फेन्सिंगचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठवण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे.

पन्हाळगडाच्या पायथ्याशी असलेल्या सोमवार पेठ, तुरुकवाडी आणि लक्ष्मी कुरणासह परिसरातील ३५०० एकर शेतीमध्ये ६०० कुटुंबातील शेतकरी पूर्णपणे पावसावरच अवलंबून कायमस्वरूपी शेती करतात. पाच वर्षांपासून त्यांच्या शेतीमध्ये शिरून गव्यांचे कळप शेतीपिकाचे नुकसान करत आहेत. एकावेळी सुमारे ४० ते ५० गव्यांचा कळप पिकात शिरतो. गव्यांच्या भीतीने शेतकरी, विशेषत: महिला शेतकऱ्यांनी घाबरून शेताकडे जाणे बंद केले आहे. गव्यांच्या नुकसानीसंदर्भात वनविभागाने वेळोवेळी पंचनामे केले आहेत. परंतु नुकसानीच्या तुलनेत अतिशय अल्प स्वरूपात भरपाई मिळत असल्याने या शेतकऱ्यांनी वनविभागाकडे गव्यांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे. येथील वनविभागाच्या वनशेतीभोवती सौरकुंपण आहे, तथापि शेतकऱ्यांच्या शेतीभोवती सौरकुंपण नसल्यामुळे या शेतकऱ्यांनी या शेतीभोवती सौरकुंपण करण्याची मागणी केली आहे.

जी. गुरुप्रसाद यांनी प्रति ६०० मीटरप्रमाणे सुमारे तीन किलोमीटर परिसरात चर मारण्याचा अथवा चेन फेन्सिंग करण्याचा प्रस्ताव करण्याबाबत सरकारकडे प्रस्ताव पाठवण्याचा पर्याय शेतकऱ्यांसमोर ठेवला आहे. यासाठी अंदाजे ५० ते ६० लाख रुपयांचा खर्च येणार असल्यामुळे त्याची तरतूद करण्यासाठी डीपीडीसी आणि राज्य सरकारकडे निधीचा प्रस्तावही डिसेंबरअखेर पाठवण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे आश्वासन जी. गुरुप्रसाद यांनी या शेतकऱ्यांना दिले. शशिकांत पोवार, कुमार चिले, अमर जाधव, आनंदा उदाळे, प्रमोद उदाळे, तानाजी काशीद, जयसिंग उदाळे, महेश भाडेकर यांच्यासह १०० शेतकऱ्यांच्या या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

# डोंबिवलीत सारस्वत बँकेत बनावट नोटा भरल्याप्रकरणी गुन्हा

● डोंबिवली, सम्यक कासारे :




डोंबिवली येथील पूर्व भागातील सारस्वत बँकेत पाचशे रूपयांच्या ४५ बनावट नोटा भरणाऱ्या ग्राहकाविरुध्द रामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित ग्राहक हे कल्याण तालुक्यातील फळेगाव येथील रहिवासी आहेत.

सारस्वत बँकेच्या व्यवस्थापक विनिता बांदकर यांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे हा गुन्हा दाखल झाला आहे. त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, गेल्या मंगळवारी फळेगाव येथील एक बँक ग्राहक सारस्वत बँकेत एटीएमच्या माध्यमातून पैसे भरण्यासाठी आले होते. त्यांच्याजवळ ५०० रूपयांच्या ९० नोटा असे एकूण ४५ हजार रुपये होते. त्याने ही रक्कम एटीएममध्ये भरणा केली. एटीएम यंत्राने या नोटांची अंतर्गत छाननी करताना खऱ्या ४५ नोटा बाहेर ढकलल्या. या नोटा ग्राहकाने ताब्यात घेतल्या. उर्वरित ४५ नोटा बनावट असल्याने त्या एटीएम यंत्रातून बाहेर आल्या नाहीत. एटीएममध्ये नोटा अडकल्याने ही माहिती ग्राहकाने बँके बाहेरील सुरक्षा रक्षकाला दिली. सुरक्षा रक्षकाने ही माहिती कार्यालयातील अधिकाऱ्यांना दिली. बँक अधिकाऱ्यांनी एटीएम यंत्रात अडकलेल्या ४५ नोटा बाहेर काढल्या. त्यांची तपासणी केली असता त्या नोटांचा कागद व्यवहारातील नोटेच्या कागदापेक्षा जाड होता. या नोटेवरील सुरक्षेच्या खुणांमध्ये तफावत बँक अधिकाऱ्यांना आढळली.

# दोन्ही पवारांनी एकत्र यावं - सुनंदा पवार

● पुणे, अभिजीत येरल्लू :


राज्यात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर अजित पवार आणि शरद पवार हे वेगळे झाले. असं असलं तरी आजही अनेक कार्यकर्त्यांना दोन्ही पवारांनी एकत्र यावं, असं वाटत असतं. त्यातच काल (१२ डिसेंबर) राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरदचंद्र पवार) अध्यक्ष शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त अजित पवार सहकुटुंब त्यांच्या भेटीला गेले. या भेटीनंतर दोन्ही पवार एकत्र यावे, अशी जोरदार चर्चा सुरू झाली. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरदचंद्र पवार) आमदार रोहित पवार यांच्या आई सुनंदा पवार यांनी मोठं विधान केलं आहे. "दोन्ही पवारांनी एकत्र यावं. संपूर्ण राज्यातील कार्यकर्त्यांना वाटतं की, विखुरलेलं कुटुंब एकत्र यावं, तेच मला देखील वाटतं," असं सुनंदा पवार म्हणाल्या.

यावर्षीची भीमथडी जत्रा येत्या २० ते २५ डिसेम्बर रोजी होणार असून याबाबत माहिती देण्यासाठी सुनंदा पवार यांची पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी त्यांना याबाबत विचारलं असता त्यांनी आपलं मत व्यक्त केलं. "काल शरद पवार यांचा ८५ वा वाढदिवस होता. हा एक कौटुंबिक प्रसंग होता आणि सगळे शुभेच्छा देण्यासाठी त्यांच्या भेटीला गेले होते. त्यामुळं या भेटीचा कुठलाही राजकीय अर्थ लावू नये. राजकारणात कार्यकर्ता हा मोठा असतो आणि त्याच्या भावना जाणून घेणं देखील राज्यकर्त्यांची जबाबदारी असते. मूठ घट्ट असेल, तर त्याची ताकद राहते. आपण विखुरलेले राहू तर ती ताकद कमी होते. मी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर करते, पण याबाबतचा निर्णय अजित पवार आणि शरद पवार घेतील," असं सुनंदा पवार म्हणाल्या.

निकालावर माझा विश्वास नाही : राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या निकालाबाबत सुनंदा पवार यांना विचारलं असता त्या म्हणाल्या, "राज्यात आलेल्या विधानसभा निकालावर माझा विश्वास नाही. राज्यात एवढी नाराजी असतानाही अशा प्रकारे निकाल लागला, हा निकाल पटत नाही."

दोन्ही पवारांनी एकत्र यावं याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे नेते अंकुश काकडे यांना विचारलं असता ते म्हणाले, "अजित पवारांनी शरद पवारांना भेटून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या ही चांगली बाब आहे. या भेटीनंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येतील, अशा चर्चा सुरू झाल्या. भविष्यात काय होईल हे सांगता येत नाही. कार्यकर्ते आणि काही प्रमुखांची इच्छा आहे की, या दोन्ही नेत्यांनी एकत्र येऊन काम करावं, तसं झाल्यास आनंदाची गोष्ट असेल. पण याचा अंतिम निर्णय शरद पवार घेतील. त्यांनी निर्णय घेतला, तर सगळेच एकत्र येतील आणि यात काही अडचण राहणार नाही. शरद पवारांनी जर निर्णय घेतला, तर त्याला कोणताही कार्यकर्ता, पदाधिकारी विरोध करेल असं वाटत नाही." राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अमोल मिटकरी यांनी केलेल्या विधानावर काकडे यांना विचारलं असता ते म्हणाले, "अमोल मिटकरी, रूपाली पाटील यांची पक्षात स्वतःची किंमत काय आहे? अमोल मिटकरीला अकोल्यात कोण ओळखतं? शरद पवार आणि अजित पवार एकत्र आले, तर अमोल मिटकरी आणि रुपाली पाटील यांची कुचंबना होणार आहे. चक्की पीसिंग म्हणणारे आज त्यांच्या मांडीला मांडी लावून बसले आहेत. एकमेकांवर केलेल्या टीकेला आज महत्त्व राहिलं नाही. काल केलेली टीका उद्या स्तुतिसुमने होऊ शकतात," असं सूचक विधान करत त्यांनी अजित पवारांना टोला लगावला.





# ठाण्यात निधीअभावी शंभरहून अधिक सीसीटिव्ही कॅमेरे बंद

● ठाणे, रोहित जैसवाल :

**ठाणे : ठाणेकरांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून संपुर्ण शहरभर बसविण्यात आलेल्या १४०० पैकी ११२ सीसीटिव्ही कॅमेरे गेल्या काही महिन्यांपासून बंदावस्थेत असून नादुरुस्त झालेल्या कॅमेऱ्यांच्या जागी नवीन कॅमेरे बसविण्यासाठी पालिकेकडे पुरेसा निधी उपलब्ध नसल्याची बाब पुढे आली आहे. त्यावर पर्याय म्हणून ठाणे महापालिकेने आता बंद कॅमेऱ्यांच्या जागेवर पोलिस योजनेतून बसविण्यात येणारे कॅमेरे बसविण्याचा विचार सुरू केला असून तशा सुचना पालिकेकडून पोलिसांना करण्यात येत आहे, अशी माहिती पालिका सुत्रांनी दिली.**

ठाणे, कळवा आणि मुंब्रा शहरात सुरक्षेच्या दृष्टीने महापालिकेने १ हजार ४०० सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. या कॅमेऱ्यांमध्ये चित्रित होणारी सर्व माहिती हाजुरी येथील नियंत्रण कक्षात संकलित केली जात असते. या कॅमेऱ्यांमुळे शहरातील अनेक गुन्हे उघडकीस करण्यासाठी पोलिसांना मदत झाली आहे. नागरिकांच्या सुरक्षेसाठी बसविण्यात आलेले हे सीसीटीव्ही कॅमेरे तांत्रिक अडचणी, झाडांच्या फांद्या पडणे, वारा, पाऊस यामुळे बंद होत असल्याचे यापुर्वी समोर आले होते. या कॅमेऱ्यांची पालिकेकडून दुरुस्ती करून ते पुन्हा कार्यान्वित करण्यात येत होते. २०१६, २०१७ आणि २०१८ या तीन वर्षात हे कॅमेरे संपुर्ण शहरात बसविण्यात आले आहेत. त्यासाठी नगरसेवक निधीही वापरण्यात आला होता.

हे कॅमेरे बसवून सात ते आठ वर्षांचा काळ लोटला असून यातील अनेक कॅमेरे आता नादुरुस्त होऊ लागले आहेत. असे काही कॅमेरे पालिकेने यापुर्वी काढून त्याजागी नवीन कॅमेरे बसविले आहेत. परंतु गेल्या काही वर्षांपासून आर्थिक संकटांचा सामना करणाऱ्या पालिकेची आर्थिक स्थिती अद्यापही रुळावर आलेली नसून नवीन कॅमेरे बसविण्यासाठी पालिकेकडे पुरेसा निधी उपलब्ध नाही. त्यामुळे नादुरुस्त कॅमेरे काढून त्याजागी नवीन कॅमेरे लावण्यासाठी निधी उपलब्ध होत नसल्याची माहिती सुत्रांनी दिली. ठाणेकरांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून संपुर्ण शहरभर बसविण्यात आलेल्या १४०० पैकी ११२ सीसीटिव्ही कॅमेरे गेल्या काही महिन्यांपासून बंदावस्थेत आहेत.

## पालिकेचा नवा पर्याय

"ठाणे शहरात नादुरुस्त कॅमेरे काढून त्याजागी नवीन कॅमेरे लावण्यासाठी २५ ते ३० लाखांच्या निधी आवश्यकता आहे. परंतु या कामासाठी पालिकेकडे निधीच उपलब्ध नाही. दरम्यान, ठाणे आयुक्तालय क्षेत्रातील ठाणे, भिवंडी, उल्हासनगर ते बदलापूर या शहरात सहा हजाराहून अधिक अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या प्रस्तावाला राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. कॅमेरे बसविण्याच्या कामाला सुरुवातही झाली आहे. त्यामुळे निधी अभावी बंदावस्थेत असलेल्या कॅमेऱ्यांच्या ठिकाणी पोलिस योजनेतील कॅमेरे बसविण्याचा पर्याय पालिकेने पुढे आणला असून त्यासाठी पालिकेकडून पोलिसांना तसे कळविण्यात येत आहे. ठाणे शहरातील बंदावस्थेत असलेले सीसीटिव्ही कॅमेरे दुरुस्त करण्यात येतात. परंतु काही कॅमेरे नादुरुस्त झाले आहेत. त्याचबरोबर पोलिसांकडून शहरात कॅमेरे बसविण्यात येत असून पोलिसांकडून त्यासाठी ठिकाणांची विचारणा करण्यात येत आहे. त्यामुळे त्यांना बंदावस्थेत असलेल्या कॅमेऱ्यांच्या ठिकाणी नवीन कॅमेरे बसविण्याबाबत कळविण्यात येत आहे.

- शुभांगी केसवाणी उपनगर अभियंता(विद्युत), ठाणे महापालिका

# नवी मुंबई येथे महालक्ष्मी सरस विक्री व प्रदर्शन

● मुंबई, यश सावंत :

राज्यातील ग्रामीण भागातील महिलांना स्वयंसहाय्यता समूहाच्या माध्यमातून संघटित करून त्यांना वैयक्तिक, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या विकसित करण्यासाठी ग्रामविकास व पंचायत राज विभागच्यावतीने महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान राबविण्यात येते. या अभियानांतर्गत महिलांना कौशल्य व उद्योगाभिमुख प्रशिक्षणे देण्यात येतात. या महिलांनी उत्पादित केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ प्राप्त करून देण्यासाठी " महालक्ष्मी सरस विक्री व प्रदर्शन – २०२४ " चे आयोजन सिडको एक्झीबिशन सेंटर, वाशी, नवी मुंबई येथे १४ डिसेंबर ते २५ डिसेंबर पर्यंत करण्यात आले आहे.

उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या माध्यमातून लाखो महिला सक्षम उद्योजिका म्हणून अनेक उत्पादनांची निर्मिती करत आहेत. त्यांनी तयार केलेली ही विविध उत्पादने देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचून त्यांना अधिकाधिक प्रोत्साहन मिळावे व त्यांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध व्हावी म्हणून दरवर्षी "महालक्ष्मी सरस विक्री व प्रदर्शन" आयोजित केले जाते. आतापर्यंत मुंबई, नवी मुंबई, नागपूर या ठिकाणी " महालक्ष्मी सरस " चे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाला दरवर्षी चांगला प्रतिसाद नागरिकांकडून मिळतो.

" महालक्ष्मी सरस " चे नवी मुंबईतील हे दुसरे वर्ष आहे. या प्रदर्शनामध्ये साधारण महाराष्ट्रातील ३७५, इतर राज्यातून साधारण १०० असे एकूण ४७५ स्टॉल असणार आहेत. तसेच खमंग आणि रुचकर शाकाहारी व मांसाहारी खाद्यपदार्थांचे ७५ स्टॉलचे मिळून भव्य असे 'फूड कोर्ट' असणार आहे. या प्रदर्शनात अनेक प्रकारच्या कलाकुसरीच्या वस्तू, हातमागावर तयार केलेले कपडे, वुडन क्राफ्ट, बंजारा आर्ट, वारली आर्टच्या वस्तू याशिवाय महिलांच्या आकर्षणाच्या अनेक प्रकारच्या ज्वेलरी, लहान मुलांसाठी लाकडी खेळणी व इतर राज्यातील दुर्मिळ वस्तूंची रेलचेल असणार आहे. या प्रदर्शनातून ग्रामीण संस्कृतीचे दर्शन शहरी नागरिकांना होणार आहे. राज्याच्या सर्व भागाची चव एकाच ठिकाणी भेट देणाऱ्यांना अनुभवता येणार आहे. सहकुटुंब भेट देणाऱ्या कुटुंबांचा विचार करून लहान मुलांना खेळवाडी (प्ले एरिया) उभारण्यात आला आहे. यावेळी या प्रदर्शनात अनुभव केंद्र असणार आहे. नवी मुंबई परिसरात सुद्धा महालक्ष्मी सरस प्रदर्शनाची परंपरा निर्माण व्हावी या हेतूने सलग दुसऱ्या वर्षी वाशी येथे हे भव्य प्रदर्शन आयोजीत करण्यात आले आहे.